सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, १ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १३१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बाबऱ्यात संत शिरोमणी सावता महाराज यांची मिरवणूक,१७व्या वंशजाचे भव्य स्वागत

बाबरा,३१जुलै : फुलंब्री तालुक्यातील बाबरा गावामध्ये श्री संत सावता मंदिरात संत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा तथा अखंड हरिनाम सप्ताहास मंगळवारी (दि.३०) रोजी सुरुवात झाली.यावेळी शिरोमणी सावता महाराज यांचे १७ वे वंशज रविकांत महाराज यांचे बाबरा नगरीमध्ये भव्य स्वागत करण्यात आले. बाबरा येथिल छत्रपती शिवाजी चौक पासून ज्ञानसुद्धा प्राथमिक शाळा पर्यंत मंगळवारी सकाळी दहा वाजता मोठ्या थाटात मिरवणूक काढण्यात आली व नंतर महाराजांनी प्रवचन केले. श्री संत सावता मंदिरात संत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा तथा अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात झाली.यावेळी शिरोमणी सावता महाराज यांचे १७ वे वंशज रविकांत महाराज यांचे बाबरा नगरीमध्ये भव्य स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमाला शिवसेनेचे शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख रमेश पवार, फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती चंद्रकांत जाधव, बाबरा येथिल सरपंच यमुनाबाई वाघ , सरपंच सोमीनाथ पाटील सोनवणे माजी उपसभापती कचरू मैदं सोसायटी चेअरमन विठ्ठल पाथरे , सरपंच भानुदास तायडे, प्रभाकर वाघ , कैलास महाराज पवार, गणेश मंत्री, रामदास तारू सुरेश तारू, दादाराव तारू शिवाजी मैंद , रामेश्वर वाघ, सुभाष पाथरे, अंबादास मैंद, दामू बर्डे, संतोष तारू, पंढरीनाथ मैंद, संजय तारू, गणेश काकडे, राहुल भिवसाने, काकासाहेब वाघ , प्रभाकर बनसोड, संदीप बनसोड, मंगलबाई वाघ , मुक्ताबाई पाथरे,शारदाबाई तुपे, जनाबाई बर्डे, छाया बनसोड , व सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## छत्रपती संभाजीनगरमध्ये मल्टी-ब्रँड डीलरशिप उघडून जीप आणि सिट्रोएनचा राज्यात विस्तार

छत्रपती संभाजीनगर : जीप आणि सिट्रोएन छत्रपती संभाजीनगरमध्ये नवीन डीलरशिप सुरू करून महाराष्ट्रात त्यांचा विस्तार वाढवत आहेत. ही मल्टी-ब्रँड डीलरशिप विविध ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी एकाच छताखाली जीप आणि सिट्रोएन कार उपलब्ध करून देत आहे. आयसीई पेट्रोल आणि डिझेल) आणि ईव्ही (इलेक्ट्रिक) अश्या कार येथे उपलब्ध असणार आहेत.ही डीलरशिप मराठवाडा विभागातील ८ जिल्ह्यांना छत्रपती संभाजीनगर येथून सेवा देणार आहे.

छत्रपती संभाजी नगरमध्ये नवीन डीलरशिपच्या उद्घाटनासह जीप आणि सिट्रोन महाराष्ट्रात त्यांचे अस्तित्व वाढवत आहेत. डीलरशिपचे उद्घाटन जीप इंडियाचे ब्रँड संचालक कुमार प्रियेश आणि तनिष्क ऑटो प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक दिलीप देशमुख याच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी डॉ सुनील केंद्रेकर (माजी विभागीय आयुक्त), सुरेशराव वरपुडकर (आमदार) आणि सुरेश देशमुख (माजी एमएलसी) यांच्या सह अन्य मान्यवर उपस्थिती होते.

या गतिमान बाजारपेठेत जीप आणि सिट्रोएन वाहनांची विस्तृत श्रेणी ऑफर करताना आम्हाला आनंद होत आहे. आमचे उद्दिष्ट केवळ आमच्या ग्राहकांना अपवादात्मक वाहने प्रदान करणे हेच नाही तर त्यांना विक्रीनंतरची सर्वसमावेशक सेवा प्रदान करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे जेणेकरून प्रत्येक ग्राहक अतुलनीय वाहन-मालकीचा अनुभव घेऊ शकेल. ही डीलरशिप ग्राहकांच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी आणि भारतभर आमची पोहोच वाढवण्याची आमची वचनबद्धता दर्शवते असल्याचे स्टेलांटिस ब्रँड हाऊसचे उद्घाटन करताना,जीप इंडियाचे ब्रँड डायरेक्टर कुमार प्रियेश यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

# एमजीएममध्ये प्राचार्य प्रताप बोराडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

### 'प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सन्मान' जेएनईसीच्या माजी विद्यार्थ्यांना करण्यात येणार प्रदान

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ : एमजीएमचे विश्वस्त प्राचार्य प्रताप बोराडे यांचा पहिला स्मृती दिन सोमवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२४ रोजी एमजीएम विद्यापीठामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करीत पाळण्यात येणार आहे. याचाच भाग म्हणून जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यास 'प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सन्मान' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. वर्ष २०२४ 'प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सन्मान' उद्योजक श्रीकांत बडवे आणि स्वप्नेषु बसेर यांना जाहीर करण्यात येत असल्याची माहिती 'प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सन्मान' निवड समितीचे अध्यक्ष अंकुशराव कदम यांनी यावेळी दिली.

विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात सोमवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या 'प्राचार्य प्रताप बोराडे स्मृति सन्मान' कार्यक्रमास एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम हे उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अभिनेते तथा एमजीएमचे माजी विद्यार्थी समीर पाटील हे असणार आहेत.



दरवर्षी दिनांक ५ ऑगस्ट रोजी प्राचार्य प्रताप बोराडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एका कर्तृत्ववान माजी विद्यार्थ्यास 'प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सन्मान' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये त्या संबंधित विद्यार्थ्याने आपापल्या क्षेत्रात उत्तम आणि प्रतिभासंपन्न काम केलेले असणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्याची निवड करण्याकरिता एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर, प्रा.जयदेव डोळे, अधिष्ठाता डॉ.एच.एच.शिंदे, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, मुख्य वित्त अधिकारी भारत पेंटावार आदि व्यक्तींचा समावेश आहे.

'प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सन्मान' स्वरूप स्मृतीचिन्ह आणि रोख रक्कम रुपये १ लक्ष असून या वर्षीचे प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सन्मान' २०२४ वर्षाचे सन्मानार्थी बडवे इंजिनियरिंग लि. (बेलराईस इंडस्ट्रीज) कंपनीची चे श्रीकांत बडवे आणि देवेन सुपरक्रिटिकल प्रा.लि. कंपनीमध्ये व्यवस्थापकीय संचालक डॉ.स्वप्नेषु बसेर हे असणार आहेत.

# लुब्रिझोलने औरंगाबादमध्ये १२० एकर जमीन खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करारावर केली स्वाक्षरी

औरंगाबाद: स्पेशॅलिटी केमिकल्समध्ये अग्रगण्य असलेल्या, लुब्रिझोल कॉर्पोरेशनने आज औरंगाबाद, भारत येथे १२० एकर जमीन खरेदी करण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्याची घोषणा केली, जिथे सुरुवातीला क्षेत्राच्या वाढत्या वाहतूक आणि इंडस्ट्रियल फ्लुइड मार्केटला पाठिंबा देण्यासाठी एक नवीन उत्पादन सुविधा उभारण्याची त्यांची योजना आहे. प्रकल्पाच्या सुरुवातीच्या टप्प्यात अंदाजे २०० मिलियन डॉलर्स गुंतवणुकीचा समावेश आहे, जी कंपनीची भारतात आजपर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक आहे आणि या क्षेत्रात आधीच केलेल्या गुंतवणुकीवर आधारित आहे.




प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर, हा प्लांट कंपनीची जागतिक स्तरावर दुसरी सर्वात मोठी उत्पादन सुविधा आणि भारतातील सर्वात मोठी उत्पादन सुविधा बनेल. पुढील काही वर्षे हे बांधकाम टप्प्याटप्प्याने सुरू राहील आणि भविष्यात विस्तारासाठी संधी मिळेल. फ्लॅव्हियो क्लिगर, अध्यक्ष, लुब्रिझोल ॲडिटीव्स म्हणाले, लुब्रिझोलने भारतात पाच दशकांहून अधिक काळ अर्थपूर्ण गुंतवणूक केली आहे. ही नवीन अत्याधुनिक उत्पादन सुविधा आम्हाला भविष्यात इतर लुब्रिझोल व्यवसायांना आणि क्षेत्राना पाठिंबा देण्याच्या क्षमतेसह, आमच्या ॲडिटीव्स व्यवसायासाठी स्थानिक क्षमता आणि योग्यता वाढवण्यास मदत करेल.औरंगाबाद प्लांटची घोषणा, या क्षेत्रातील विकासाला गती देण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर क्षमता वाढवण्यासाठी कंपनीच्या नवीनतम प्रयत्नांचे संकेत आहे. २०२३ मध्ये, लुब्रिझोलने गुजरातमधील विलायत येथे जगातील सर्वात मोठ्या सीपीव्हीसी रेझिन प्लांट उभारण्यासाठी, गुजरातमधील दहेज येथील लुब्रिझोलची साइट क्षमता दुप्पट करण्यासाठी, नवी मुंबईत ग्रीस लॅब उघडण्यासाठी आणि देशांतर्गत अतिरिक्त रोजगार वाढ आणि नवकल्पना सक्षम करण्यासाठी आपल्या ५० वर्षांपेक्षा जास्त वर्षांच्या इतिहासात या क्षेत्रातील १५० दशलक्ष अमरीकी डॉलर इतकी महत्त्वपूर्ण गुंतवणूकीची घोषणा केली. या व्यतिरिक्त, या वर्षी कंपनीने या क्षेत्रातील विकासाला गती देण्यासाठी आणि ग्राहक आणि कर्मचारी यांच्यातील जवळचे सहकार्य सक्षम करण्यासाठी एक स्ट्रॅटेजिक हब म्हणून आपले पहिले ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर पुण्यात उघडले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती अ.ई.आवटी सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड, न्यायालय क्र.२ जि. औरंगाबाद यांचे न्यायालयात - ND ०३/०८/२४**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०३/२०२४.

अर्जदार : १ उषा भ्र. बाळासाहेब चव्हाण वयः ५८ वर्षे, धंदाः शेती व घरकाम रा. मुंगसापुर कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २ अलका प्र. नारायण जाधव वय: ३९ वर्षे, धंदाः घरकाम रा. गोंडेगाव ता.नांदगांव जि. नाशिक. ३ वैभव पि. बाळासाहेब चव्हाण वयः २९ वर्षे, धंदाः शेती रा. मुंगसापुर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४ सुभ्रद्राबाई भ्र. हरीभाऊ चव्हाण वय: ८४ वर्षे, धेदाः शेती रा. मुंगसापुर ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी औरंगाबाद

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरिल अर्जदार क्र. १ ते ४ यांनी मे. न्यायालयात त्याचे वकिल श्री.बि.जे. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र.। चे पती व अर्जदार क्र. २ ते ३ यांचे वडिल व अर्जदार क्र.४ चे पती नामे बाळासाहेब पि. हरीभाऊ चव्हाण हे दि. २१/२/२०२४ रोजी मौजे तडवळ ता. अक्कलकोट जि.सोलापुर येथे मयत झाले असुन मयत बाळासाहेब पि. हरीभाऊ चव्हाण यांस अर्जदार क्र. १ ते ४ यांचे शिवाय ईत्तर कोणीही कायदेशिर वारस नाही. मयताचे नावे मौजे मुंगासापुर ता. कन्नड येथे गट क्र.४९ मध्ये ०.८५ आर क्षेत्र असुन सदर क्षेत्र वारसांचे नावे नोंद करणे कामी महसुल कार्यालयात मयताचे महसुल दप्तरी नोंद घेणे असलेने सदर कार्यालया मार्फत अर्जदार क्र. ते ४ यांचे कडे वारस प्रमाण नोंद घेणे कामी मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जदार यांचे कडे महसुल कार्यालयाने केलेली आहे अर्जदार यांना मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदाराने सदरचा अर्ज वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात सादर केला आहे. याबाबत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आल्यास त्यंनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात लेखी स्वरुपाने स्वता अथवा आपल्या विधिज्ञां मार्फत उजर सादर करावा. मुदतित उजर किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारित करण्यात येतिल.

दि..०६/७/२०२४

आदेशावरुत

विभागीय लिपीक | सहाय्यक अधिक्षक

## जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

सिव्हील एम.ए क्र. ८९/२०२४

अर्जदार : १) वच्छलाबाई उत्तमराव गवई, वय ६१ वर्षे, धंदा घरकाम, रा शरद पवार कॉलनी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, २) कल्पना पि. उत्तमराव गवई उर्फ कल्पना भ्र. सुभाष सरदार, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा वरिल प्रमाणे ३) अनिल उत्तमराव गवई, वय रा- वरिल प्रमाणे ४१ वर्षे, धंदा व्यापार ४) ज्योती उत्तमराव गवई, वय रा- वरिल प्रमाणे ३४ वर्षे, धंदा घरकाम,

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी वरील अर्जदार याने ॲड. पी.एस. साळवे यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयतांना या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

१) असे की, अर्जदार क्र. १ ह्या मयत उत्तमराव परशराम गवई यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ते ४ हे मयत उत्तमराव परशराम गवई यांचे मुले आहे. अर्जदार क्र. १ ते ४ असे मयत उत्तमराव परशराम गवई यास कायदेशीर वारस आहे. मयत उत्तमराव परशराम गवई हे दि. २२/०५/२००१ रोजी वरखेड, ता. चिखली, जि. बुलडाणा येथे मयत झाले आहे. मयत उत्तमराव परशराम गवई यांचे कायदेशीर वारसदार अर्जदार हे असल्याबाबत शासकीय व निमशासकीय कार्यालयात आवश्यकता आहे, त्याकरीता अर्जदार यांना वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. उत्तमराव परशराम गवई यांचे कायदेशीर वारस अर्जदार हे असल्याबाबत

त्या अर्थी, मयत वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कुणास कसल्याही प्रकारचा उजर, आक्षेप, हरकत असेल अशांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप मा. न्यायालयात दाखल करावा. अर्जदाराच्या नांवाने वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

सबब आज दिनांक ०४/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

लिपीक | अधिक्षक न्यायालय

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर नोटीस

आमचे पक्षकार श्री. ज्ञानेश्वर भिमराव काळे, रा. हतनूर ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांनी दिलेल्या माहितीवरुन जाहीर नोटीस देण्यात येते की, आमचे पक्षकार यांची मौजे हतनूर ग्राम पंचायत गावठाण हददीत मिळकत क्रमांक ६७२ क्षेत्र २५ × २५ फुट आर.सी.सी. चे केलेल्या वांधकामाचे 'मालक असून सदरील गाळा हा दरमहा ७,०००/- रुपये भाडया प्रमाणे दिनांक १.६.२०१६ रोजी ढोकेश्वर मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. सोसा.लि.. लासलगांव ता. निफाड जिल्हा नाशिक यांना १० वर्षाच्या मुदती करीता भाडे करारनाम्यावर देवून त्यातील सर्व अटी मान्य केल्यानंतर सदरील दस्त हा नोटराईज करण्यात आला. सदरील सोसायटीने आमच्या पक्षकारास ५०,०००/- रुपये नगदी रोख दिले असून कराराची मुदत संपल्यानंतर सदरील रक्कम एक रकमी परत करण्या बाबत ठरले होते. सदरील सोसायटी कडे आमचे पक्षकार यांचे एकूण ६,२३,०००/- रुपये भाडयाची रक्कम व प्रतिवर्षी १० टक्के भाडेवाढीची रक्कम ६२,३००/- अशी एकूण' ६,८५,३००/- रुपये बाकी असल्यामुळे आमचे पक्षकार यांनी वकीला मार्फत दिनांक ६.७.२०२४ रोजी रजि. पोस्टाने नोटीस देवून सदरील रक्कम नोटीस मिळाल्यापासून मुदतीचे आत आणुन दयावे नसता सदरील गाळा हा आमचे पक्षकार यांना त्यांच्या ताब्यात घेता येईल, अशा आशयाची नोटीस देवून सुध्दा संबंधीत ढोकेश्वर मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. सोसायटी यांनी कोणत्याही प्रकारची नोटीस मध्ये दर्शविल्या प्रमाणे अटीची पुर्तता न केल्यामुळे व सदरील सोसायटीचे कार्यालय हे मिळून येत नसल्यामुळे नोटीस विना तामील परत आली आहे.

तरी या जाहीर नोटीस व्दारे ढोकेश्वर मल्टीस्टेट अर्बन को- ऑप. सोसायटी लासलगांव ता. निफाड जि. नाशिक यांना अथवा त्यांच्या 'पदाधिका-यांना, चेअरमण व संचालक मंडळ यांना सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकाराचे भाडयाची वरील प्रमाणे पैशाची तरतुद करावी नसता आमचे. पक्षकार हे सदरील गाळा ताब्यात घेतील त्या बाबत आपणास कोणत्याही प्रकारे कार्यवाही करण्याचा अधिकार राहणार नाही. सबब ही जाहीर नोटीस.

दिनांक : २३.०७.२०२४

मार्फत- | जाहीर नोटीस देणार

ॲड. भानुदास डी. थोरात, कन्नड | श्री. ज्ञानेश्वर भिमराव काळे

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा. क. २०२४/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/मिआर-३००

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड | दिनांक ०५/०६/२०२४

अर्जदार : मच्छिंद्र कडुनाथ जाधव रा. माळीवाडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : नगर परिषद माळीवाडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड एस. आर राउत यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांच्या भावाचे चे मृत्युचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या भावाचा मृत्यु दिनांक ३०/०६/२०१० रोजी माळीवाडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या भावाचा मृत्यु दिनांक दिनांक ३०/०६/२०१० रोजी माळीवाडा ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या भावाचा मृत्यु दिनांक ३०/०६/२०१० रोजी माळीवाडा येथे मृत्यु झाल्याचे मृत्यु प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेव प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १०/०७/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपना आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ३०/०६/२०१० रोजी माळीवाडा येथे मृत्यु झाल्याचे मृत्यु प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ५/०६/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायलयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## नवीन एक्सक्लुसिव्ह स्टोअर लाँच

नांदेड: शहरातील पुरूषांसाठी कॅज्युअल वेअरची नवीन व फॅशनेबल लाइन-अप सादर करत लॉमन या केवल किरण क्लोथिंग लिमिटेडच्या अधिपत्याखालील प्रतिष्ठित मेन्स अफोर्डेबल लक्झरी फॅशन ब्रँडने आज महाराष्ट्रात त्यांच्या दुसऱ्या एक्सक्लुसिव्ह स्टोअरचे उद्घाटन केले. लॉमनचे महाराष्ट्रातील नांदेड येथील नवीन स्टोअर दर्जात्मक ट्रेण्डिंग डिझाइन्स, आधुनिक फॅब्रिक्स देत पुरूषांच्या कॅज्युअल, वर्क व पार्टी वेअरसाठी दर्जा उंचावते.

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोद/सिआर-३८७

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड | दिनांक २५/०७/२०२४

अर्जदार : संजय यादवराव निकम रा. नादरपुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय नादरपुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड डि. एम. रहाणे यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलीचा जन्म दिनांक २७/०४/२०१५ रोजी नादरपुर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक २७/०४/२०१५ रोजी नादरपुर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तमा अर्ज अर्जदार यानी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक २७/०४/२०१५ रोजी नादरपुर ता. कन्नड ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०४/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २७/०४/२०१५ रोजी नादरपुर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया महीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-३६५

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड | दिनांक ८/०७/२०२४

अर्जदार : भगवान पिता पोपट चंदवाडे रा. खापरखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचात कार्यालय पळसखेडा- खापरखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या आजीचे मृत्युचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या आजीचा मृत्यु दिनांक ०१/०१/१९७२ रोजी पळसखेडा- खापरखेडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार आजीचा मृत्यु दिनांक दिनांक ०१/०१/१९७२ रोजी पळसखेडा- खापरखेडा ता. कन्नड येथे आलेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या आजीचा मृत्यु दिनांक ०१/०१/१९७२ रोजी पळसखेडा- खापरखेडा ता. कन्नड येथे मृत्यु झाल्याचे मृत्यु प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/ आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०७/०८/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०१/०१/१९७२ रोजी पळसखेडा- खापरखेडा ता. कन्नड येथे मृत्यु झाल्याचे मृत्यु प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ८/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोद/सिआर-३८८

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड | दिनांक २४/०७/२०२४

अर्जदार :- संजय यादवराव निकम रा. नादरपुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय नादरपुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड डि. एम. रहाणे यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०१/०७/२००९ रोजी नादरपुर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०१/०७/२००९ रोजी नादरपुर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक ०१/०७/२००९ रोजी नादरपुर ता. कन्नड ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०४/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्याम अर्जदारास दिनांक ०१/०७/२००९ रोजी नादरपुर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**श्रीमती, काटकर मैडम दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

एम. ए. आर. जे. आय. नं. १६८/२०२३ पुढील तारीख ३०/०९/२०२४

अर्जदार : १) रेखाबाई भ्र. रावसाहेब भाले, वय ५८ वर्ष धंदा घरकाम, रा. टाकळी रा, रा, ता. खुलताबाद ज़ि औरंगाबाद. २) सुनिल रावसाहेब भाले, वय २८ वर्ष, धंदा मजुरी, रा. वरील प्रमाणे. ३) अनिल रावसाहेब भाले, वय २५ वर्ष, धंदा शिक्षण, रा. वरील प्रमाणे ४) सुवर्णा भ्र. शिवाजी मोहिते, वय ३४ वर्ष धंदा शिक्षण, रा. वरील प्रमाणे

विरूद्ध

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

विषय :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी, उपरोक्त अर्जदारांनी मा. न्यायालयात ॲड. माजेद पटेल यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे मौजे हतनुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथील रहिवासी असून ते कामधंदयानिमित्त वरील दिलेल्या पत्यावर वास्तव्यास आहे. अर्जदार क. १ यांचे पती व अर्जदार क. २ ते ४ यांचे वडिल नामे रावसाहेब पि. श्रीपत भाले यांचा मृत्यू दि. ०१/०७/२०२१ रोजी टाकळी रा, रा, येथे झालेला आहे. मयत रावसाहेब पि. श्रीपत भाले यांची अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मुले आहेत. अर्जदार क. ४ ही मुलगी आहेत, मयत रावसाहेब पि. श्रीपत भाले यांचे आई-वडिल हे फार वर्षापूर्वी मयत झालेले असल्यामुळे ते मयत झाल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदाराकडे उपलब्ध नाही, अर्जदारांशिवाय मयत रावसाहेब पि. श्रीपत भाले यांना इतर कोणतेही कायदेशीर वारसदार नाही. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांना मयत रावसाहेब पि. श्रीपत भाले यांचे वारस प्रमाणपत्र हे तलाठी कार्यालय व इतर महसुल कार्यालयात तसेच शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्यामुळे सदर अर्ज दाखल करण्याचे कारण घडले आहे.

त्याअर्थी, या नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या नावे ते मयताचे वारसदार असल्याचे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणास उजर अथवा आक्षेप असेल त्यांनी सदर जाहिर प्रगटन प्रसिद्धिपासून ३० दिवसांच्या आत या मा. न्यायालयात लेखी नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा उजर, आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे ते मयताचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप, ग्राहय धरला जाणार नाही, करीता आज दिनांक २५/०७/२०२३ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक | सहायक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. शिवाजी सीताराम क्षीरसाठ राहणार गोरोंबानगर कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर, यांनी दिलेल्या अधिकार पत्रावरून व माहितीवरून मि खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करत आहे.

श्री. शिवाजी सीताराम क्षीरसाठ राहणार गोरोंबानगर कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर, हद्दीतील रहिवासी असून माझे पक्षकार यांच्या मालकीच्या मिळकतीचा नोंदणीकृत दस्त.क्र. ४८५८/२००४ दिनांक ११/१०/२००४ आणि दस्त.क्र. ४९२७/२०१३ दिनांक १३/११/२०१३ (खरेदीखत) दिनांक ३०/०७/२०२४ रोजी अधानेर फाटा ते चाळीसगाव रोड येथे हरवला आहे. तसेच माझ्या आशीलाने त्या दस्ताचा शोध सगळ्या ठिकाणी घेतला असता तो मिळून आलेला नाही. त्या अनुशंघाने माझ्या आशीलाने पोलीस ठाणे कन्नड येथे सदर नोंदणीकृत दस्त.क्र. ४८५८/२००४ दिनांक ११/१०/२००४ आणि दस्त.क्र. ४९२७/२०१३ दिनांक १३/११/२०१३ (खरेदीखत) गहाळ झाल्या बाबतची लेखी तक्रार दि. ३०/०७/२०२४ रोजी दिलेली आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, सदर दस्त.क्र. ४८५८/२००४ दिनांक ११/१०/२००४ आणि दस्त.क्र. ४९२७/२०१३ दिनांक १३/११/२०१३ (खरेदीखत) हे कोणाला मिळाल्यास जाहीर प्रगतानापासून सात (७) दिवसात माझे अशील पक्षकार श्री. शिवाजी सीताराम क्षीरसाठ राहणार गोरोंबानगर कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर, (मोबाईल क्र. ९७६३०८६७९१) यांच्याशी संपर्क करण्यात यावा. करिता जाहीर प्रगटन.

दि. ३०/०७/२०२४ | प्रगटन देणार

स्थळ : छत्रपती संभाजीनगर | ॲड. राहुल सिंगारे पाटील, ९४२३७६०९८७

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी कि. अर्ज.क्र. /१२९/२०२४

अर्जदार : १) अनवर बदरुद्दीन शेख, वय ३९ वर्ष, धंदा व्यापार, रा. शिवनगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २) गुलजार बानो मोहम्मद फिरोज शेख, वय- ४४ वर्ष, धंदा- घरकाम, रा. शिवनगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३) मुशरफ बदरूद्दीन शेख (मयत)-वारस- ३-अ) उजमा मुशरफ शेख, वय ३९ वर्ष, धंदा घरकाम, रा. शिवनगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३-ब) खालेद मुशरफ शेख, वय १९ वर्ष, धंदा- शिक्षण, रा. शिवनगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३-क) सलामत मुशरफ शेख, वय ०८ वर्ष, धंदा- शिक्षण, रा. शिवनगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैर अर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद,

अर्ज : कायदेशीर वारस प्रमाणपत्र (लिगल हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेबाबत.

मा. महादय,

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. पी. एस. जाधव यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ३-क हे वरील ठकाणचे कायमचे रहीवाशी आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र. ३-अ यांचे सासरे व अर्जदार क्र. ३-ब.क यांचे आजोबा नामे बदरुद्दीन शरफुद्दीन शेख हे होते ते दिनांक ३०/११/२०२३ रोजी मयत झालेले आहे. मयत बदरुद्दीन शरफुद्दीन शेख यांच्या पत्नी जैबुन्नीसा बदरुद्दीन शेख या देखील दिनांक ०२/०२/२०१४ रोजी मयत झालेल्या आहे, सोबत दोघांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच महसुल कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ३-क यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार क्र. १ ते ३-क हेच मयतांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज दाखल कलेला नाही. व वारस प्रमाणपत्र घेतलेले नाही, अर्जदार अर्जासोबत मयताचे मृत्यु प्रमाणपत्र, व अर्जदारांचे आधार कार्ड साबत देत आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, अक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात स्वतः अगर आपले विधीज्ञा मार्फत हजर राहुन उजर, अक्षेप सादर करावा मुदतीत उजर, अक्षेप न आल्यास अर्जदार यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १९/०७/२०२४

आदेशावरुन

क. लिपिक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, १ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १३१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## औद्योगिक वसाहतीच्या पायाभूत सुविधांसाठी १०० कोटीचा निधी - विखे पाटील

### डिफेन्स क्लस्टरच्या बैठकीत निर्णय

शिर्डी दि.३१ जूलै - महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने उभारल्या डिफेन्स क्लस्टर उद्योग समूहात शिर्डी एमआयडीसीची निवड झाली असून सवलतीच्या दरात जागा देण्याचा निर्णय उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज दिला. तसेच या औद्योगिक नगरीच्या रस्ते आणि वीज विकासासाठी १०० कोटी रुपयांना मान्यता देण्यात आली. यामुळे आता शिर्डी एमआयडीसीचा विकास जलद गतीने होऊन शिर्डीची देवस्थानाबरोबर आता औद्योगिक नगरी म्हणून नवी ओळख तयार होणार असल्याचा विश्वास अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला आहे.



डिफेन्स क्लस्टर अंतर्गत उभारल्या जाणाऱ्या उद्योगासाठी १००० कोटींची गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना सवलतीच्या दरात २०० एकर जमीन देण्याचा निर्णय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने घेतला आहे. यासंदर्भात आज उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीला महसूलमंत्री तथा अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री अहमदनगर राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, औद्योगिक विकास महामंडळ मुख्य कार्यकारी अधिकारी विपिन शर्मा, विकास आयुक्त डॉ.दीपेंद्रसिंह खुशावत, सहमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, उद्योग विभागाचे सहसचिव संजय देगावकर, माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांच्यासह उद्योजक कौस्तुभ धवसे, गणेश निबे व इतर औद्योगिक विकास महामंडळाचे सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते. शिर्डी एमआयडीसी परिसर हा ५०२ एकर असून यातील २०० एकर जागा सवलतीच्या दरात देण्याचे आदेश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. तसेच इतर सवलतीच्या दरांसाठी राज्यमंत्रीमंडळाकडे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले. सदरचा निर्णय हा शिर्डी, अहमदनगर, नाशिक तसेच आसपासच्या जिल्ह्यासाठी महत्त्वाचा असून यामुळे मोठ्या प्रमाणात स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. शिर्डी क्षेत्र हे देवस्थान म्हणून ओळखले जाते त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात उद्योग येणार असल्याने एक औद्योगिक हब म्हणून उदयास येईल. असा विश्वास महसूलमंत्री श्री.विखे पाटील यांनी व्यक्त केला.

## केरळ सरकारमुळेच १५८ जणांचा बळी : अमित शाह

### पूर्व सूचना मिळूनही कारवाई न केल्याचा आरोप

नवी दिल्ली, ३१ जुलै : केरळ सरकारला पूर्वकल्पना आणि मदत देऊनही राज्य सरकारने वेळीच पावले न उचलल्यामुळे १५८ जणांचा बळी गेल्याची खंत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केली. यासंदर्भात आज, बुधवारी गृहमंत्र्यांनी राज्यसभेत भाष्य केले.



केरळच्या भूस्खलनातील दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करून गृहमंत्री म्हणाले की, केरळ सरकारला २३, २४ आणि २५ जुलै रोजी पाऊस आणि भूस्खलनाची पूर्व कल्पना देण्यात आली होती. तसेच केंद्र सरकारने २३ तारखेला एनडीआरएफची ९ पथके केरळला पाठवली होती. परंतु, राज्य सरकारने नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठी काहीच केली नाही. आगामी २६ जुलैला २० मिमीपेक्षा जास्त पाऊस पडेल, भूस्खलन होऊ शकते, चिखलही येऊ शकतो आणि काही लोकांचा मृत्यू होऊ शकतो, असे आम्ही आधीच सांगितले होते. तरी देखील केरळ सरकारने लोकांचे स्थलांतर केले नाही. स्थलांतर केले असते, तर इतक्या लोकांचा जीव गेला नसता असे शाह यांनी सांगितले.

## पूजा खेडकरची उमेदवारी रद्द; भविष्यात यूपीएससीच्या कोणत्याही परीक्षेस बसण्यास बंदी!

नवी दिल्ली : गेल्या महिन्याभरापासून चर्चेत असणाऱ्या पूजा खेडकर यांची उमेदवारी केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यूपीएससीने अखेर रद्द केली आहे. आधी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील गैरवर्तन व त्यानंतर कागदपत्रांमध्ये आढळलेली कथित अनियमितता या पार्श्वभूमीवर पूजा खेडकर यांची उमेदवारी यूपीएससीने रद्द केल्याचे समजते. विशेष म्हणजे यापुढे यूपीएससीकडून घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षेमध्ये पूजा खेडकर यांना बसता येणार नाही, असेही यूपीएससीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पूजा खेडकर यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

यूपीएससीने पूजा मनोरमा दिलीप खेडकर यांना दिलेली प्रोव्हिजनल उमेदवारी रद्द केली आहे. पूजा खेडकर यांनी सनदी सेवेत निवड होताना त्यांच्या दिव्यंगत्वाबाबत चुकीची कागदपत्रे सादर केल्याचाही आरोप करण्यात आला. शिवाय, त्यांच्या वडिलांची कोट्यवधींची मालमत्ता असूनही त्यांनी ओबीसी क्रिमी लेअर सुविधेचा लाभ घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, यासाठी त्यांनी परीक्षेसाठी अर्ज करताना नावामध्येही वारंवार बदल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांनी याचबाबत फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून त्याचा उल्लेख न्यायालयातील सुनावणीमध्ये करण्यात आला. तसेच पूजा खेडकर यांच्या पालकांचा घटस्फोट झालाय की नाही? याचीही चौकशी पोलिसांकडून केली जात आहे.












## अग्रलेख...

# मुक्ताफळछंदी विरोधी पक्षनेता

निरर्थक मल्लिनाथी करणे, सतत वादग्रस्त विधाने करणे अशा पराक्रमांसाठी आधीच ख्यातकीर्त झालेले राहुल गांधी आता जातीय मुद्यावर नको तितका भर देऊ लागले असून त्यांच्या या भूमिकेमुळे देशातील सामाजिक ऐक्याला नख लागते की काय, अशी भीती वाटू लागली आहे. राहुल गांधी आता लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. विरोधी पक्षनेतेपदाचे पद लोकशाहीत फार महत्त्वाचे, आदराचे असते. सत्ताधीशांएवढेच महत्त्व विरोधकांना लोकतांत्रिक व्यवस्थेत दिले गेले पाहिजे, या सूत्राचे प्रतिबिंब म्हणजे विरोधी पक्षनेत्याचे पद. राहुल गांधी यांच्या पक्षाला म्हणजे काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत शंभरचा आकडा भेदता आला नाही, पण आता ते एका कथित चक्रव्यूहाची आणि तो भेदण्याची भाषा करताहेत. काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये, हे ज्याला कळते तो खरा शहाणा असतो, असे म्हणतात. राहुल गांधी नेहमीच नको ते बोलतात. भारताच्या अर्थसंकल्पावरून, तो प्रत्यक्ष छापायला देण्यापूर्वी, शेवटचा हात फिरविला जातो तेव्हा अर्थ मंत्रालयात 'बजेट हलवा' कार्यक्रम आयोजित करण्याची पद्धत फार जुनी आहे. या कार्यक्रमाला साधारणतः अर्थमंत्री, त्या खात्याचे राज्यमंत्री आणि निवडक अधिकारी असतात. अर्थसंकल्पाचे पुस्तक छापायला आरंभ करण्यापूर्वी हलवा कार्यक्रम होतो. या हलवा कार्यक्रमादरम्यान अर्थसंकल्प तयार करण्याच्या कामात सहभागी असलेल्या सगळ्यांना हलवा दिला जातो. अनेकदा भारताचे अर्थमंत्री स्वतः हलवा वितरण करतात. हे त्यांनी केलेल्या कामाचे गोड प्रतीक असते. बजेट प्रत्यक्ष सादर होईपर्यंत हे सारे लोक कार्यालयातच असतात. दोन-तीन वर्षांपूर्वीपर्यंत या लोकांचा कार्यालयातच राहण्याचा जो कालावधी होता, तो अधिक होता. आता छपाईऐवजी डिजिटल फॉर्मेट आल्यामुळे हा लॉक इन पिरियड कमी झालेला आहे. पण, अर्थसंकल्प संसदेत सादर होईपर्यंत हे कर्मचारी बाहेरील जगाच्या संपर्कात येऊ शकत नाहीत. त्यांच्या कामाचे एक प्रकारे कौतुक करण्याचे माध्यम म्हणजे हलवा कार्यक्रम. या हलवा कार्यक्रमात राहुल गांधी महाशयांनी जातीय क्लेष काढून कहर केला.

अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान हलवा कार्यक्रमाचे छायाचित्र दाखवीत ते म्हणाले, ज्या २० अधिकाऱ्यांनी अर्थसंकल्प तयार केला, त्यात एकही मागासवर्गीय किंवा आदिवासी नाही. आता बोला! अर्थसंकल्पाच्या निर्मिती प्रक्रियेतदेखील जात सांभाळायची असते, हे नवीन तत्त्वज्ञान म्हणायचे. त्यामुळेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी कपाळावर हात मारून घेतला. त्यानंतर राहुलबाबा चक्रव्यूह आणि अभिमन्यू या प्रतीकांवर बोलले आणि ते लोकांनी ऐकले. त्यांना नेमके काय म्हणायचे होते, ते त्यांना जरी कळले असेल तरी फावले. केंद्र सरकारने भारतातील लोकांना अभिमन्यूसारखे चक्रव्यूहात अडकवले आहे आणि आम्ही सारे विरोधक हा चक्रव्यूह भेदू... वगैरे... कशाचा कशाशी संबंध नाही. भारताचे केंद्रीय सरकार हे लोकनियुक्त सरकार आहे. काँग्रेसने प्रचंड आपटाआपटी करून केवळ जागा मिळाल्या आणि म्हणून विरोधी पक्षनेते पद मिळाले. यापूर्वीच्या निवडणुकांत विरोधी पक्षनेते पद मिळण्याएवढ्या जागादेखील काँग्रेसला मिळविता आल्या नव्हत्या. यावेळी त्या मिळाल्या, हे लोकशाहीचे सौंदर्य म्हणावे. पण, त्या सौंदर्याला बाधा आणणारी विधाने राहुल गांधी यांनी केली आहे आणि एक प्रकारे विरोधी पक्षनेते पदाची अब्रूच त्यांनी पायदळी तुडविली. सांकेतिक रूपात का होईना, पण पंतप्रधान, गृहमंत्री या मंडळींना देशाचे शत्रू ठरवणे हा संसदीय परंपरेच्या दृष्टीने मोठा अपराध आहे आणि तो राहुल गांधी यांनी केलेला आहे. सरकारने विरोधकांना स्वतःचे किंवा देशाचे शत्रू म्हणू नये, ठरवू नये, हा जसा संकेत आहे, तो विरोधकांनादेखील लागू आहे. त्यांनीसुद्धा टीका करण्याच्या नादात सत्ताधीशांना शत्रू ठरवू नये. विरोधी पक्षाने सरकारवर टीका केलीच पाहिजे. सरकारला धारेवर धरलेच पाहिजे. सरकारला लोकाभिमुख निर्णय घेण्यास भाग पाडलेच पाहिजे. पण, ज्या अधिकाऱ्यांनी अर्थसंकल्प तयार केला, त्यांच्या जाती आणि धर्मांवर प्रश्न उभे करणे आक्षेपार्ह आहे. त्या अधिकाऱ्यांना ते अमुक जातीचे किंवा धर्माचे आहेत म्हणून बजेट तयार करण्याची जबाबदारी दिली गेलेली नव्हती. त्यांची क्षमता, अनुभव यावरून या कामाची जबाबदारी दिली जाते. त्यात जात शोधायची म्हणजे राहुलबाबांच्या कल्पकतेचा कहर म्हटला पाहिजे. राहुलबाबांची आणखी काही मुक्ताफळे अशीच गोंधळी पद्धतीची. अर्थसंकल्पातील इंटर्नशिप कार्यक्रमाचा युवकांना काहीही फायदा होणार नाही (कारण ते माझे म्हणजे राहुल गांधींचे मत आहे), अग्निपथ योजनेत युवकांची फसवणूक झाली (कारण राहुलबाबांना तसे वाटते) आणि शेतकऱ्यांच्या हातावर सरकारने तुरी दिल्या (कारण राहुल गांधी यांना तसे वाटते). यातल्या कशाचाही त्यांनी तार्किक उलगडा केलेला नाही. आडात नसेल तर पोहऱ्यात येण्याची शक्यता नसतेच. राहुल गांधी यांचा अर्थकारणाचा, समाजकारणाचा अभ्यास जेमतेम आहे, हे वारंवार सिद्ध झालेले आहे. भारत हा विविध जाती-धर्मांचा, परंपरांचा देश आहे. या देशासारखे वैविध्य जगात कुठेही नाही. त्यांच्या आज्जीबाई म्हणजे इंदिराजी यांचे वडील- भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि त्यांच्या समकालीन नेत्यांनी, अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारख्या द्रष्ट्या पुढाऱ्यांनी, भारताने या वैविध्याचा उत्सव साजरा केला पाहिजे, अशी भावना रुजविली आणि तिला विविधतेतील एकता (युनिटी इन डायव्हर्सिटी) असे नाव दिले. हे तत्त्व हळूहळू का होईना, लोकजीवनात आणि लोकमानसात रुजले. भारतातील लोकांचे भावनिक ऐक्य दिवसागणिक मजबूत होत गेले त्यामागे आपल्या तत्कालीन द्रष्ट्या नेत्यांचे मार्गदर्शन होते. राहुल गांधी नेमके उलटे वागतात. ते जातील तिथे जात, धर्म यावर बोलून वातावरण बिघडवितात. राजकीय नेत्यांनी समाजाला भेदांच्या पलीकडे जाऊन विचार करण्यास शिकवायचे असते. लोकांच्या मानसिक, भावनिक ऐक्याशी दिग्दर्शन करायचे असते. जातीपातीचे प्रश्न भारतात आहे. विषमता आहे. ती होती आणि आणखी काही काळ राहणार आहे. विषमता घालवायची असेल तर तिला आधी मनातून घालवावे लागेल. पण, मनांमध्ये विष कालवण्याचा प्रयत्न करणारी वक्तव्ये करणारा विरोधी पक्षनेता असेल तर दोष तरी कुणाला द्यायचा...? असे वक्तव्य भाजपाच्या एखाद्या नेत्याने किंवा पदाधिकाऱ्याने केले असते तर केवढा गहजब झाला असता, याची कल्पनादेखील करवत नाही. पण, राहुल गांधी यांना जणू काही सारे अपराध माफ आहेत. त्यामुळे ते जवळजवळ सुटतातच आणि भरकटत जातात. त्यांच्या भाषणात सूत्रबद्ध मांडणी नसते, तर्कशुद्ध विस्तार नसतो. असलाच तर तो विखार असतो आणि विषाक्त टीकाटिप्पणी असते. हे देशासाठी चांगले नाही. समाजाच्या भल्याचे नाही. राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते आहेत. त्यांच्या भोवती मल्लिकार्जुन खडगे यांच्यासारखे अनुभवी आणि ज्येष्ठ लोकही आहेत. त्यांनी राहुल गांधी यांना क्लास घेतला पाहिजे. त्यांना लोकशाही, संसदीय परंपरा, सत्ताधारी आणि विरोधकांचे परस्पर संबंध, सामाजिक सौहार्दाचे देशाच्या विकासातील महत्त्व, अर्थकारण, समाजकारण अशा अनेक विषयांची त्यांना शिकवणीच द्यावी लागणार आहे. ती जबाबदारी काँग्रेस आणि अन्य विरोधकांमधील ज्येष्ठांनी घेतली पाहिजे. राहुल गांधी यांच्यासारखा अपरिपक्व माणूस विरोधी पक्षनेता असणे हे विरोधी पक्षाच्या एकूण प्रतिमेला सोयीचे नाही. ते संसदीय परंपरेला साजेसे नाही आणि लोकशाहीला शोभणारेही नाही. त्यामुळे आता राहुल गांधी यांना विरोधी पक्षनेता म्हणून निवडण्याच्या निर्णयाचा फेरविचार विरोधी पक्षांच्या पातळीवर झाला पाहिजे. असे सुचवावेसे वाटते. यात सरकारचे फार काही बिघडत नाही. त्यांची टीकाटिप्पणी किती गांभीर्याने घ्यायची, हे सरकारला ठरविता येऊ शकते. पण, राहुल गांधी यांच्या अशोभनीय वक्तव्यामुळे संसदेचे आणि पर्यायाने देशाचे वातावरण बिघडते. त्यांची जबाबदारी सरकारवर येणार नाही. ती विरोधकांवर येईल. विरोधकांचा जाब द्यावा लागेल. त्यामुळे असे तारतम्य नसलेले व्यक्तिमत्त्व विरोधकांचा नेता म्हणून ठेवायचे असावे काय, याचा निर्णय समस्त विरोधकांना कधी तरी करावाच लागेल. राहुलबाबांचा मुक्ताफळांचा छंद थांबवावाच लागेल.

## प्रासंगिक

राहुल गोखले

# लोकमान्य अन् स्वातंत्र्यवीर!

लोकमान्य टिळकांचा स्मृतिदिन उद्या १ ऑगस्ट रोजी आहे. लोकमान्यांचा भारताच्या जनमानसावर विलक्षण पगडा आहे. त्यांच्या देहावसानाला १०४ वर्षे होत असतानाही ते 'गारुड' अद्याप कायम आहे. याचे कारण लोकमान्यांचे जीवनच अलौकिक असे होते. यंदाचे वर्ष हे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मुक्ततेचे शताब्दी वर्ष आहे. त्यामुळे लोकमान्य आणि स्वातंत्र्यवीर यांच्या एका अर्थाने गुरू-शिष्य नात्याचा मागोवा घेणे औचित्याचे ठरावे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांची अंदमानच्या कारागृहातून १९२१ च्या मे महिन्यात सुटका झाली. त्याच्या काही महिने अगोदर लोकमान्य टिळकांचे देहावसान झाले होते. १ ऑगस्ट १९२० रोजी टिळक निवर्तले. याचे वृत्त सावरकरांना अंदमानात समजले. ज्यांच्या युयुत्सु वृत्तीचा आदर्श नेहमी ठेवला होता त्या आपल्या लोकनेत्याचे निधन झाल्याचे वर्तमान ऐकून सावरकरांना अतीव दुःख झाले असणार, यात शंका नाही. भारतीय असंतोषाच्या जनकाच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी अंदमान कारागृहात सावरकरांसह बंद्यांनी उत्स्फूर्तपणे उपोषण केले होते. लोकमान्यांच्या जीवनाचा सर्वच क्रांतिकारकांवर मोठा पगडा होता. सावरकर आणि लोकमान्यांची प्रत्यक्ष भेट होऊन अनेक वर्षे लोटली असली, तरी लोकमान्यांचा त्यांच्यावरील प्रभाव कायम होता. लोकमान्यांच्या देहावसानानंतरही तो कायम राहिला. लोकमान्यांचा क्रांतिकारकांना आशीर्वाद होता. सावरकरांसारख्या जाज्वल्य देशभक्ताला तो असणार, यात नवल नाही. सावरकरांची टिळकांवर एवढी श्रद्धा होती की, टिळक हे मुख्य प्रवाहातील नेते असल्याने आणि आणि पर्यायाने भूमिगत राहू शकत नसल्याने टिळक जे उघडपणे बोलू आणि करू शकत नाहीत, ते गुप्त क्रांतिकारी संघटनांनी केले पाहिजे, अशी सावरकरांची धारणा होती. सावरकर आणि त्यांच्या मित्रांनी मित्रमेळ्याची जी स्थापना केली ती त्याच ऊर्मीतून. टिळकांवर सावरकरांनी लहान वयात कविता रचली होती. पुण्यात शिक्षणासाठी आल्यानंतर सावरकरांना टिळकांचा सहवास आणि मार्गदर्शन मिळाले. १९०२ साली सावरकर पुण्यात आले आणि टिळक, शिवरामपंत परांजपे यांच्याशी त्यांच्या भेटी होऊ लागल्या. सावरकर तरुण नेते म्हणून उदयास येत होते आणि सावरकरांच्या मनातील ती तळमळ टिळकांनी हेरली होती. त्यामुळेच सावरकरांनी केलेल्या उपक्रमांना टिळकांनी नेहमीच प्रोत्साहन दिले.

बंगालच्या फाळणीला टिळकांचा विरोध होता. फाळणीचा विरोध





करण्यासाठी आंदोलन करण्याच्या योजनेत सावरकरांनी परदेशी कपड्यांची होळी करण्याची योजना मांडली. ती सभा झाली तेव्हा टिळक पुण्यात नव्हते; मात्र ते परतल्यानंतर सावरकरांनी त्यांच्यासमोर ती योजना मांडली आणि टिळकांना ती कल्पना पसंत पडली; पण एक अटही त्यांनी घातली. ती म्हणजे होळी करण्यासाठी थोडेथोडके नव्हे तर मोठ्या प्रमाणावर कपडे गोळा करायला हवेत. प्रत्यक्ष होळीसाठी जी मिरवणूक निघाली तेव्हा लोकमान्य टिळकही त्यात सहभागी झाले आणि त्यांनी भाषणदेखील केले. याच होळीमुळे सावरकरांना फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतिगृहातून काढून टाकण्यात आले तेव्हा टिळकांनी केसरीत 'हे आमचे गुरू नव्हेत' हा जहाल अग्रलेख लिहून प्राचार्यांना फैलावर घेतले होते. पुढे सावरकरांनी ब्रिटनला जाऊन शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. श्यामजी कृष्ण वर्मा यांच्याकडून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी त्यांनी अर्ज केला. त्याबरोबर सावरकरांनी दोन शिफारसपत्रे आवर्जून जोडली. एक होते शिवरामपंत परांजपे यांचे आणि दुसरे अर्थातच टिळकांचे. टिळकांनी पत्रात लिहिले होते, 'हा तरुण (सावरकर) अत्यंत तडफदार असल्याचा माझा अनुभव आहे. सरकारी नोकरी कधीही करायची नाही, असा त्याचा निश्चय आहे आणि त्याचे नैतिक आचरण फार चांगले आहे.' टिळक आणि परांजपे यांची शिफारसपत्रे असल्याने सावरकरांना शिष्यवृत्ती नाकारण्याचा प्रश्नच नव्हता. याचे कारण स्वतः वर्मा हेही टिळकांचे भक्त होते. टिळकांना १८९७ साली अटक झाल्यानंतर वर्मा यांनी भारत सोडून लंडनमध्ये कायमचे स्थायिक होण्याचा निर्णय घेतला होता. वर्मांनी शिष्यवृत्तीची पहिली खेप म्हणून ४०० रुपये टिळकांकडे पाठवून दिले. करारपत्रावर सह्या करण्यासाठी आणि शिष्यवृत्तीची रक्कम घेण्यासाठी सावरकरांनी आपल्या निवासस्थानी यावे म्हणून टिळकांनी सावरकरांना निरोप धाडला होता. १९०६ साली सावरकरांची लोकमान्यांशी झालेली ती भेट अखेरची ठरली.

इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असतानाच मॅझिनीच्या चरित्राचा अनुवाद करून ते हस्तलिखित सावरकरांनी आपले बंधू बाबाराव यांना पाठवले. १९०७ साली प्रकाशित झालेला तो ग्रंथ लोकमान्यांना अर्पण करण्यात आला होता. काँग्रेसचे अधिवेशन नागपूरला झाले तर टिळक अध्यक्ष म्हणून निवडून येतील, या भयाने अधिवेशन नागपूरऐवजी सुरतला हलविण्यात आले. हेच ते गाजलेले १९०७ चे आणि मवाळ आणि जहाल यांच्यात फूट पडलेले अधिवेशन. मात्र, लंडनमध्ये असूनही सावरकरांचे स्वदेशात घडणाऱ्या घडामोडींकडे बारीक लक्ष होते. टिळक हेच काँग्रेसचे अध्यक्ष निवडून यावेत आणि नागपूरला त्यास विरोध झाला तर तो उधळून लावावा, असे सावरकरांनी पत्रातून बाबारावांना कळविले होते. अर्थात पुढे अधिवेशन सुरतला झाले. बाबाराव तेथेही आपल्या तरुण सहकाऱ्यांना घेऊन गेले होते. पुढे टिळकांची रवानगी मंडाले तुरुंगात झाली आणि सावरकरांची अंदमान तुरुंगात. तथापि, लोकमान्यांच्या हालहवालाविषयी जाणून घेण्याची सावरकरांना तुरुंगात असतानाही उत्कंठा असायची. अंदमानात अगोदर सावरकरांना पत्र लिहिण्यास अनुमती नव्हती; मात्र १९१३ साली त्यांना ती मिळाली तेव्हा आपले बंधू नारायणराव सावरकरांना त्यांनी जे पत्र लिहिले त्यात अन्य काही विषयांबरोबर टिळकांची मुक्तता कधी होणार, हाही एक प्रश्न होता.

१९२० साली लोकमान्यांचे देहावसान झाले आणि त्यानंतर काही महिन्यांनी सावरकरांची अंदमानातून सुटका झाली. त्यामुळे लोकमान्य आणि सावरकर यांची जरी भेट झाली नाही तरी पुढच्या जीवनात लोकमान्यांचा मोठा प्रभाव सावरकरांवर राहिला. अंदमानातून सुटका झाल्यावर राजकारणात भाग न घेण्याच्या अटीवर सावरकरांची रवानगी रत्नागिरीला करण्यात आली. टिळकांनी समाजाच्या जागरणासाठी सार्वजनिक गणेशोत्सव अनेक वर्षांपूर्वी सुरू केला होता. रत्नागिरीत असताना सावरकरांनी त्याच गणेशोत्सवाला अखिल हिंदू स्वरूप दिले. काँग्रेस अंतर्गतच लोकमान्यांनी १९२० साली लोकशाही स्वराज्य पक्षाची स्थापना केली होती. रत्नागिरीतील स्थानबद्धतेतून सुटका झाल्यावर सावरकरांनी सुरुवातीला त्याच लोकशाही स्वराज्य पक्षात प्रवेश केला आणि कालांतराने ते हिंदू महासभेला जाऊन मिळाले. लोकमान्यांच्या जन्मशताब्दी वर्षात पुण्यात स्थापन झालेल्या सर्वपक्षीय समितीने जन्मशताब्दी समारंभात मुख्य भाषण देण्यासाठी सावरकरांना निमंत्रित केले.

सावरकरांची लोकमान्यांवर निस्सीम भक्ती होती याचा प्रत्यय त्यांचे लेखन, भाषण आणि कृती यातून आल्याखेरीज राहत नाही.

९८२२८२८८१९

## वेध

गिरीश शेरेकर

# पाणी तुंबण्याची समस्या सार्वत्रिक

मोठ्या शहरांसह छोट्या शहरांमध्ये पावसाचे पाणी तुंबण्याची समस्या आता विक्राळ रूप धारण करीत आहे. परवा दिल्लीतल्या जुन्या राजेंद्र नगरात झालेली जीवघेणी घटना डोळ्यांसमोर आली की, यंदाच्या पावसात महाराष्ट्रातल्या पाणी तुंबणाऱ्या शहरांची नावे पटापट तोंडातून बाहेर पडतात. गेल्या काही वर्षांपासून हे सातत्याने होत असून दरवर्षी नव्या शहराची नावे त्यात जोडली जातात. काही ठिकाणी तर जीवघेणे प्रसंग उद्भवले आहेत. त्याचा दोष पावसाला देता येत नाही. कारण, पाऊस आपले काम करतो आहे. फक्त त्याचे वेळापत्रक बिघडले आहे. कुठे एकदम जास्त तर कुठे कमी असा असमतोलपणा पावसाचा निश्चित वाढला आहे. पाऊस पूर्वी येतच होता आणि आता पण येतोच. फरक इतकाच आहे की, पूर्वी आलेल्या पाण्याचा व्यवस्थित निचरा व्हायचा; आता ते तुंबून राहते. पाणी तुंबणे ही समस्या वाढत्या शहरीकरणाच्या नियोजनशून्य विकासातून व शहर रचनेचे कमकुवत नियम आणि आहे त्याची सातत्याने होणाऱ्या मोडतोडीतून निर्माण झाली आहे. काही ठिकाणी मानवीय तर काही ठिकाणी यंत्रणेतल्या दोषातून हे नियम तुडविले जातात. त्याचे परिणाम राज्यातली अनेक शहरे आता भोगत आहेत.

पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी देशात दिल्लीपासून तर गल्लीपर्यंतच्या ज्या काही यंत्रणा आहेत, त्या यंत्रणांचा आपसात नसलेला समन्वय हेदेखील पाणी तुंबण्याच्या समस्येच्या पाठीमागचे महत्त्वाचे कारण आहे. वाढत्या लोकसंख्येला पुरेल इतक्या सुविधा उभ्या करणे हे शासनाचे कामच आहे. हे करत असताना सर्व यंत्रणांना सोबत घेऊन आणि जेथे काम होणार आहे, तेथील व्यवस्था समजून काम केले तर अपवादानेच समस्येचा प्रश्न निर्माण होईल. पण, प्रत्यक्षात तसे अजिबात होत नाही. उदाहरण सांगायचे झाल्यास, शहराच्या मुख्य भागात रस्ता बांधणारी यंत्रणा बांधकाम विभाग असेल तर ते आवश्यक विभागांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन काम सुरू करतात. ना-हरकत देणारे विभाग मात्र बांधकामामुळे भविष्यात पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची, वीजवाहिन्यांची, सांडपाणी वाहून जाण्यासह अन्य कोणती अडचण निर्माण तर होणार नाही ना, याची कोणतीही खातरजमा न करताच प्रमाणपत्र देऊन मोकळे होतात. नागपूर, अमरावती, चंद्रपूर, अकोला, पुणे, कोल्हापूर, नाशिक, जळगावसह अन्य शहरांमध्ये पाणी तुंबण्याची जी समस्या भेडसावत आहे, ती यातून निर्माण झाली आहे. पहिले नियोजन करायचे नाही आणि संकट उभे राहिले की हातपाय मारायचे, असा हा प्रकार आहे. वेळेवरच्या उपायाने काही होत नाही. जे नुकसान व्हायचे ते होतेच. दरवेळी तसे अनुभव येत आहेत. एक वेळ अशी होती की, फक्त मुंबईतूनच पाणी तुंबण्याची बातमी यायची. संबंधित यंत्रणांनी सुसूत्रता आणल्याने आता मुंबईपेक्षा इतर शहरातल्याच बातम्या जास्त यायला लागल्या आहेत. भविष्यात त्या आणखी येण्याची शक्यता आहे.

विकासाची कामे नागरिकांचे जगणे सुसह्य करण्यापेक्षा ते कठीण करत असेल तर त्या विकासाला शाश्वत विकास म्हणता येत नाही. जनतेला विकासाची कामे दाखवायची म्हणून ती पटापट वाटेल तशी करून टाकायची, हा लोकप्रतिनिधींचा सोपा धंदा आहे. पण, जे काम आपल्या पुढाकाराने होत आहे, त्यातून भविष्यात काही अडचणी येणार नाहीत, याची पुरेशी काळजी यंत्रणेशी सल्लामसलत करून घेतलीच जात नाही. करून टाका, पाहून घेऊ आणि पाहण्याची वेळ आली की, हात वर केले जातात. सार्वत्रिक होत असलेल्या पाणी तुंबण्याच्या समस्येवर अभ्यासपूर्ण उपाययोजनांची नितांत गरज आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची कोणत्याच शहरात ठोस व्यवस्था नाही. ज्या काही आहेत त्या कमकुवत ठरल्याचे अनेक शहरांमध्ये नुकतेच दिसले आहे. काही ठिकाणी रस्ते उंच झाले तर घरे, दुकाने खाली गेली. काही ठिकाणी त्याच्या उलट झाले आहे. दोन्ही प्रकारांत नुकसान आहेच. जिवावर बेतेल इतपत ही समस्या गंभीर होत आहे. यावरचा पहिला उपाय म्हणजे, आहे त्या शहरांच्या रचनेचा व तेथील पायाभूत सुविधांचा नव्याने अभ्यास करून अडचणी शोधणे! त्या एकवेळा समोर आल्या की उपाययोजना करणे सहज शक्य आहे. काही ठिकाणी तर अगदी छोटे कारण समस्येचे मूळ ठरले आहे. पण, पायाभूत सुविधा उभी करणारी एकही यंत्रणा आपली जबाबदारी चोख बजावत नसल्यानेच या समस्या उद्भवत आहेत. या सर्व यंत्रणांना एका सूत्रात बांधून विकास कामे करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. देशपातळीवर त्याची एक आदर्श कार्यपद्धती विकसित करून त्याच पद्धतीने ते काम व्हायला हवे. धोरण ठरविणाऱ्या राज्यकर्त्यांचे डोळे उघडले तरच काही सकारात्मक परिणाम समोर येण्याची शक्यता आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# सौंदर्यलहरी : आद्य शंकराचार्यांची ज्ञान गूढ गम्य रचना

चार महिन्यांपूर्वी गुलबर्ग्याच्या सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ, सौंदर्यलहरीच्या साधक आणि तरुण भारतच्या नित्य वाचक डॉ. सौ. मेघा कमलापूरकर यांचा मला भ्रमणध्वनी आला. त्यांनी माझा 'तरुण भारत'मधील 'श्रीललितासहस्रनामा'वरील लेख वाचून माझ्याशी संपर्क केला की, गुलबर्गा येथे आमचे मोठे सौंदर्यलहरी साधक मंडळ आहे. त्यांच्यासमोर आपण सौंदर्यलहरी मांडा. श्रीसूक्त, श्रीयंत्र, ललितासहस्रनामावर मी यथाबुद्धी बोलतो; पण 'सौंदर्यलहरी' मात्र तितका अभ्यासलेला नाही.

*अभ्यासेची प्रकट व्हावे, नाहीतर झाकोनी असावे।*
*प्रकट होवोनी नासावे, हे बरे नव्हे।*

म्हणून मी सकारण विनम्र नकार दिला. डॉ. मेघाताईंनी मला 'सौंदर्यलहरी' अभ्यासण्याची सूचना केली. त्यांचे सहज बोलणे हाच उपदेश समजून मी आज्ञापालन म्हणून सौंदर्यलहरी वाचण्यास घेतला. 'सौंदर्यलहरी' ही आदिशंकराचार्यांनी रचिलेली नितांतसुंदर, त्वरित फलदायी आणि प्रासादिक रचना आहे. सौंदर्यलहरी हे भगवती महात्रिपुरसुंदरी ललितांबिका अर्थात आद्या शक्तीच्या सौंदर्याचे वर्णन असून त्यात एकूण १०० श्लोक आहेत. 'सौंदर्यलहरी' हा त्रिगुणात्मिका जगदंबा, महात्रिपुर सुंदरीचा केवळ स्तुतिपाठ नसून प्रत्येक श्लोक हा स्वतंत्र मंत्र आहे. सध्याच्या भाषेत सांगायचे तर 'सौंदर्यलहरी' म्हणजे १०० मंत्रांचे मंत्रसंकुल आहे.

या मंत्रसंकुलातील प्रत्येक मंत्राची स्वतंत्र विद्या आहे, स्वतंत्र यंत्र आहे आणि प्रत्येक मंत्राचे स्वतंत्र तंत्र आहे. थोडक्यात, प्रत्येक श्लोकाचे स्वतंत्र अस्तित्व आहे. श्रीमद् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्यांनी आपल्याला दिलेले हे शतश्लोकी अद्भुत तंत्रविज्ञान किंवा तंत्रशास्त्र आहे. आपल्यासारख्या सामान्य माणसांनी हे भावभक्तीने आणि आर्तभावाने म्हणावे. तांत्रिकजनांनी यंत्र-मंत्र आणि तंत्रासह जबाबदारीने साधना करावी. 'द्वयोरपि समं फलं!' दोघांनाही अपेक्षित फळ मिळते.

सौंदर्यलहरी निर्मितीच्या संदर्भात विविध भेद आहेत. एका मतानुसार सौंदर्यलहरी पूज्यपाद आदिशंकराचार्य अगदी शिशु अवस्थेत म्हणजे अवघे पाच वर्षांचे असताना त्या महात्रिपुरसुंदरीच्या कृपाशीर्वादाने त्यांनी हे स्तुतिगायन रचिले. संत शिरोमणी नामदेवरायांच्या जीवनात भगवंतांनी प्रसाद खाल्ल्याची कथा आपणास ज्ञात आहे. नेमकी तशीच कथा पूज्यपाद शंकराचार्यांच्या जीवनात घडली. त्यांचे वडील बाहेरगावी गेल्यामुळे आदिशंकराचार्य जगदंबेला पायस प्रसाद घेऊन गेले. खूप वेळ झाला तरी भगवती पायस ग्रहण करत नाही पाहिल्यावर आदिशंकराचार्य अस्वस्थ झाले. त्यांनी त्या भवानीला आर्त हाक मारली. स्वतःचे डोके आपटायला सुरुवात केली. तेव्हा साक्षात जगदंबा प्रकट झाली. तिने पायस ग्रहण केले आणि अर्धा पायस प्रसाद आदिशंकराचार्यांना दिला. जगदंबेचा तो उच्छिष्ट प्रसाद ग्रहण करताच त्यांच्या मुखारविंदातून बाहेर पडलेले भगवतीचे सौंदर्य चित्रण म्हणजे 'सौंदर्यलहरी' होय.

दुसरे मत ज्योतिर्मठाचे विद्यमान शंकराचार्य पूज्यपाद अविमुक्तेश्वरानंद महाराजांच्या नुसार आदिशंकराचार्यांनी विविध मताचे जसे खंडण केले तसे शक्तीचेही खंडण केले. असेच परिभ्रमण करीत असताना ते तापाने आजारी पडले. त्यांना एका वैद्याने एक पुडी दिली आणि ती दह्यासोबत खाण्यास सांगितले. ते अशक्त असल्यामुळे त्यांना उठताही येईना. त्याच वेळी रस्त्यावरून एक दहीवाली जात होती. तिचा आवाज ऐकून त्यांनी तिला दही मागितल्यावर तिने 'इकडे रस्त्यावर येऊन दही घेऊन जा' म्हटले. तेव्हा शंकराचार्य भगवान म्हणाले, 'तिथपर्यंत येण्याचीही शक्ती नाही.' तेव्हा ती दहीवाली म्हणाली की, 'उठण्याची शक्ती नाही म्हणतो आणि शक्तीचे खंडण करतो.' तेव्हा पूज्यपाद शंकराचार्यांना लक्षात आले की, दहीवाली नसून ही भगवती पराशक्ती आहे. तिला पाहताच त्यांच्या मुखातून १०० श्लोकी स्तोत्र बाहेर पडले; ते 'सौंदर्यलहरी' आहे.

तिसऱ्या कथेनुसार भगवद् पूज्यपाद आदिशंकराचार्य मानससरोवरावर असताना तपश्चर्येच्या योगाने भगवान महादेवांनी प्रसन्न होऊन त्यांना स्वयं शंभूंनी भवानीच्या सौंदर्याचे वर्णन केलेले १०० श्लोकी 'सौंदर्यलहरी' स्तोत्र दिले. ते घेऊन जाताना वाटेत त्यातील अर्धे स्तोत्र भगवान नंदी यांनी फाडून घेतले. नंदीची तक्रार करण्यास ते महादेवाजवळ गेल्यावर त्यांनी जे आहे ते घे आणि पुढील श्लोकांची रचना तू कर. ते होते ४१ श्लोक. उर्वरित ५९ श्लोक आद्य शंकराचार्यांनी रचले.

भगवान शंकरांकडून मिळालेल्या ४१ श्लोकांना 'आनंदलहरी' तर शंकराचार्यांनी रचलेल्या ५९ श्लोकांना 'सौंदर्यलहरी' म्हणतात. 'आनंदलहरी' निर्गुण ब्रह्म उपासना तर 'सौंदर्यलहरी' सगुण ब्रह्म उपासना आहे. सगुण निर्गुण ब्रह्म उपासना मंत्र मिळून बनणाऱ्या शतक मंत्रांना 'सौंदर्यलहरी' म्हटले जाते. दोन्हींमध्ये जगदंबेच्या सौंदर्याचे नितांतसुंदर वर्णन आहे. इथे सौंदर्य म्हणजे शृंगार नसून ते लेकराने केलेले आपल्या आईचे म्हणजे ललितांबिकेचे निखळ मातृसौंदर्य आहे. लहरी म्हणजे कंपन. त्या कधीच नष्ट होत नाहीत. उलट त्या लहरींचा सर्वत्र संचार असतो. अजून एका प्रघाताप्रमाणे सौंदर्यलहरीची उकल मेरू पर्वतावर भगवान गणेश किंवा पुष्पदंत यांनी केल्याबाबत वर्णन आहे. विस्तारभयाने त्याचे वर्णन टाळतो. सौंदर्यलहरीचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या इतर स्तोत्रात शेवटी वेगळी फलश्रुती असते. इथे मात्र प्रत्येक श्लोक हाच मंत्र असून त्या मंत्रातच फलश्रुती आहे. प्रत्येक श्लोकमंत्राची वेगळी आदिदेवता आहे. प्रत्येक श्लोकाचे वेगळे यंत्र आहे. मूळ श्रीविद्या आहेच, पण श्रीविद्येच्या विविध शाखा प्रत्येक श्लोक मंत्रात आहेत. १०० श्लोकांच्या १०० सिद्धी आहेत. मंत्र किंवा मंत्रसमूह विविध चक्र म्हणजे यंत्र रचना किंवा स्वरूप दर्शविते आणि सोबतच बाला त्रिपुरसुंदरी भगवती श्रीश्री चक्रराजनिलया जगदंबा स्वरूपाचे लावण्यवर्णन यात आहे.

भगवतीच्या लक्षणवती अंगप्रत्यंगाचे अलौकिक वर्णन असलेल्या सौंदर्यलहरी स्तोत्रात बहिरंग आणि अंतरंग उपासना आहे. योगसाधकांना कुंडलिनी जागरण, शरीरातील मूलाधारादी विविध चक्र जागरण सुकर होणारे श्लोकमंत्र यात आहेत. आद्याशक्तीच्या दिव्य तेजानेच चराचर सृष्टी प्रकाशमान आहे. तिच्याच शक्तिप्रेरणेने ब्रह्मा-विष्णू-महेश आपापली कार्ये सुचारू रूपाने करू शकतात. 'सौंदर्यलहरी' हे त्या आद्यशक्ती असलेल्या मूळमाया आणि शस्त्र विद्येचे तात्त्विक, यौगिक आणि प्राकृतिक सगुण रूपाचे रसगर्भित, भक्तिपूर्वक आणि मनोहर असे वर्णन आहे. कर्ममार्ग, ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्गाचा समन्वय असलेले तंत्रशास्त्र म्हणजे 'सौंदर्यलहरी' होय. हे तंत्रशास्त्र असले, तरी आपल्यासारख्या सामान्य माणसांना निखळ अंतःकरणाने अर्चन केल्यास हे ज्ञान गूढ असले तरी गम्य आहे.

९८२२२६२७३५

## एका माळेचे मणी

महाराष्ट्राला बुद्धिवादी, विवेकवादी, विज्ञानवादी, समतावादी, समाजातील अंधश्रद्धा निर्मूलन पुढाकार घेणारी, देवाधर्माच्याही पलीकडे गेलेली मानवतावादी विचारसरणी असल्या क्षेत्रात काम करणाऱ्या थोडक्यात स्वतःला पुरोगामी विचारवंत असणाऱ्या साहित्यिक, सामाजिक, तसेच अन्य क्षेत्रातील काम करणाऱ्या लोकांचा मोठा वारसा लाभला आहे, असे म्हटले जाते. अलिकडील काळात या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व मंडळींनी आपल्या मूळ लक्ष्य, ध्येयापासून फारकत घेतली का? असे वाटावयास लागले आहे. कारण, या मंडळींची अलिकडील वक्तव्ये, भाषणे पाहिली की आपल्या सामाजिक, विज्ञान, अंधश्रद्धा या मूळ विषयाला सोडून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, हिंदुत्व, देशातील लोकशाही, ती केंद्र सरकारने कशी धोक्यात आणली आहे, देशाची घटना या विषयावरील सातत्याने आपले विचार मांडत असतात. ही मंडळी एका पक्षाशी वा त्या विचारसरणीच्या संबंधित आहेत. मग आपले कार्यक्षेत्र सोडून या पुरोगामी मंडळींना जर राजकारण करावयाचे असेल तर निवडणुकीच्या राजकारणातच का सरळ उतरत नाही, असाही प्रश्न पडतो. गेल्या लोकसभा निवडणुकीत असीम सरोदे व डॉ. विश्वंभर चौधरी यांनी 'निर्भय बनो' या बॅनर खाली केंद्र सरकार विशेषतः नरेंद्र मोदींविरोधात प्रचार केला होता. आता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे श्याम मानव महाविकास आघाडीतर्फे मैदानात उतरले आहे. सध्या त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांची जोरात बॅटिंग चालवली आहे. एकीकडे बोलावयाचे आम्ही सामाजिक कार्य करीत आहोत आणि दुसरीकडे या माध्यमातून सरकारला लक्ष्य करत आपला खरा एजेंडा चालवायचा, असा उद्योग पूर्वाश्रमीच्या समाजवादी, डाव्या विचारसरणीच्या सगळ्या मंडळींचा झाला आहे. आज या मंडळींचे खायचे दात वेगळे दाखवायचे वेगळे आहेत.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

## मी करदाता... हो मी गुन्हेगार!

हो, मी करदाता आहे. त्यातही मध्यमवर्गीय. त्यातला त्यात नोकरीपेशा आणि हाच माझा गुन्हा आहे. वार्षिक उत्पन्न १२ लाख; त्यात वर्षाला १ लाख २० हजार जीपीएफ, ८० हजार एलआयसी, ज्यावर १८ टक्के जीएसटी म्हणजे १४ हजार ४०० सरकारला. हाऊसिंग लोन १ लाख २० हजार; त्यातून ७२ हजार व्याज बँकेला म्हणजे सरकारला. कार लोन वार्षिक हप्ता १ लाख ५६ हजार, त्यातून व्याज १ लाख २० हजार बँकेला म्हणजेच सरकारला. वैयक्तिक कर्ज वार्षिक हप्ता ९६ हजार त्यातून व्याज ५० हजार म्हणजे बँकेला म्हणजे सरकारला. मी सर्वसामान्य मध्यमवर्गीय. माझे इलेक्ट्रिक बिल वार्षिक ५० हजार त्यावर जीएसटी १८ टक्के म्हणजे ९ हजार वर्षाला परत सरकारला. वार्षिक किराणा ८४ हजार त्यावर १२ टक्के जीएसटी म्हणजे १० हजार ८० रुपये परत सरकारला. घरात ३ मोबाईल. प्रत्येकात २ सिमच्या रिचार्जचा विचार करता १४ हजार ४०० यावर परत जीएसटी २५९२. सर्वसाधारण नागरिक महिन्यातून एकदा हॉटेलला जातो आणि अंदाजे ८०० रुपये खर्च करतो. म्हणजे वर्षाला ९६००. त्यावर परत ७६८ जीएसटी. वर्षभरात २० हजार रुपये दसरा-दिवाळीमध्ये कपडे घेतो. त्यावर परत ५ टक्के जीएसटी म्हणजे १००० परत सरकारला. मुलांच्या शिक्षणाचा खर्च वर्षाला ८० हजार; त्यावर ५ टक्के जीएसटी, हेल्थ इन्शुरन्स ३० हजार. त्यावर १८ टक्के जीएसटी ५४००. दूध खर्च २४ हजार त्यावर १२०० जीएसटी, सण-लग्न-वाढदिवस भेट १५ हजारांवर जीएसटी. एवढा सर्व खर्च करून त्यावर विविध प्रकारे जीएसटीमध्ये १८ टक्के देऊन बचतीसाठी काहीच वाचत नाही. तरीदेखील मी करदाता. वर्षाला ८५ हजार इन्कम टॅक्स भरावा. 'खायला नाही दाणा आणि करदाता म्हणा' अशी म्हणण्याची वेळ आली आहे. माझ्या भरलेल्या पैशावर शासन निवडणूक जिंकण्यासाठी लाडकी भाऊ आणि लाडकी बहीण योजना राबवत आहे. सरकारला व्याजापोटी २ लाख ४२ हजार वर्षाला भरून, जीएसटी रूपात वर्षाला ८० हजार भरल्यावर परत बचतीसाठी काहीही पैसे वाचत नसतानादेखील इन्कम टॅक्सपोटी परत ८५ हजार भरणे म्हणजे एक प्रकारचा अन्याय आहे.

**अजय देवघरे**/नागपूर

## लाडकी बहीण योजना दिलासादायक

लाडकी बहीण योजना तमाम महिला वर्गाला दिलासा देणारी आहे. तसे पाहिले तर मध्यमवर्गीयांमध्ये अशा बऱ्याच महिला आहेत, त्यांनादेखील या योजनेचा लाभ



मिळावा, असे मनापासून वाटते. तेव्हा सरकारने उत्पन्नाची मर्यादा वाढवावी; जेणेकरून त्यांनाही लाडकी बहीण योजनेचा फायदा होईल तसेच गॅस सिलेंडरच्या व पेट्रोलच्या किमती कमी केल्यास तमाम जनतेला दिलासा मिळेल तसेच ईपीएस-९५ च्या पेन्शनरचा प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने प्रयत्न केल्यास पेन्शनधारक खूश होतील. नाही तर येणाऱ्या निवडणुकीत मतदानाचे प्रमाण गेल्या वेळेपेक्षा कमी झाले तर नवल वाटायला नको.

**विजय देशपांडे**/९०९६६५९४७०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

# केरुळमध्ये सशस्त्र दरोडेखोरांचा हल्ला
## कुटुंबात दोघे जखमी ;एक गंभीर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जुलै**

आष्टी तालुक्यातील किन्ही येथील दरोड्याची घटना ताजी असतानाच तालुक्यातील केरुळ येथील भागवत वस्तीवर दोरडखोरांनी सोमवारी मध्यरात्री रात्री १ ते २ च्या दरम्यान दशहत माजवत अज्ञात दरोडेखोरांनी सशस्त्र दरोडा टाकला.मारहाण करत दरोडखोरांनी सोने,चांदीचे, दागिने रोख रक्कम लुटली दरोडेखोरांच्या मारहाणीत राजू महादेव भागवत (वय ३०) यांच्यावर सुमारे ९ चाकुचे वार झाल्याने त्यांना अहमदनगर येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर,श्वान पथक,फिंगर प्रिंट पथक,आष्टी चे सहाय्यक पोलिस निरीक्षक विक्रांत हिंगे ,नरवडे, पोलिस शिंदे,वाणी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व दरोडेखोरांच्या तपासासाठी पोलिस अधीक्षकांनी ४ ते ५ पथकांची नेमणूक केली आहे



तालुक्यातील केरुळ येथील टेंभीच्या माळाजवळील राजू महादेव भागवत यांच्या घरामध्ये सोमवारी मध्यरात्रीनंतर अज्ञात ५ ते ७ दरोडेखोरांनी काठी, कुर्हाड,चाकू अशी हत्यारे घेऊन घरात घुसले. कुटुंबातील मुलासह सर्वांना काठीने मारहाण करत चाकूचा धाक दाखवून दहशत माजवली.दरोडेखोरांनी भागवत यांच्या घरातील रोख रकमेसह सोन्या-चांदीचे दागिने लूटले.भागवत यांच्या घरात दरोडेखोरांना विरोध करणार्या राजू महादेव भागवत यांना मारहाण करत त्यांच्यावर जवळपास नऊ चाकूने वार केल्यामुळे ते गंभीर जखमी झाले असून त्यांना अहमदनगर येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.दरोडा टाकल्यानंतर दरोडेखोर पसार झाले.गावात दरोडा पडल्याचे समजताच अनेकजण जमले.नागरिकांनी डायल ११२ वर माहिती दिली.त्यामुळे पोलिसांची गाडी घटनास्थळी दाखल झाली.तोपर्यंत दरोडेखोर दूरवर गेले होते.दरोडेखोरांना पकडण्यासाठी पहाटेपासून पोलिसांचा फौजफाटा सर्वत्र फिरत आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण,आष्टी पोलिस ठाण्याचे पोलिस शोध घेत होते. घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर,श्वान पथक,फिंगर प्रिंट पथक,आष्टी चे सहाय्यक पोलिस निरीक्षक विक्रांत हिंगे ,नरवडे, पोलिस शिंदे,वाणी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व दरोडेखोरांच्या तपासासाठी पोलिस अधीक्षकांनी ४ ते ५ पथकांची नेमणूक केली आहे.आष्टी पोलिस जखमींचे जवाब आणण्यासाठी अहमदनगर कडे रवाना झाले आहेत.



संभाजीनगर-मागील मोठ्या कालावधी पासून बीड शहरातील बाह्यवळण रस्त्यावर स्लिप रस्ता व शहरातील दोन्ही प्रमुख मार्गावर उड्डाणपूल तयार व्हावा यासाठी आ.संदीप क्षीरसागर पाठपुरावा करत आहेत. यासंदर्भात मंगळवारी (दि.३०) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक श्री. इंगोले यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी लवकरात लवकर काम सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम साहेब उपस्थित होते.

## सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी उमेदवारांना सहा महिन्याचा वाढीव कालावधी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जुलै**

राज्यात सध्या सुरु असलेल्या सन २०२४-२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी ( अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायीक अभ्यासक्रमां सहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासुन सहा महिन्यांचा कालावधी देण्यात येत आहे.



स्वामी गणेश चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डोणगांव (दर्गा) ता.अंबड येथील शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य रुस्तुम खेडकर सर आज दि.३१ जुलै २०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा कुलकर्णी परिवाराच्या वतीने सपत्नीक सत्कार करताना श्रीकांत कुलकर्णी

## शिवसेनेच्या वतीने बीड शहरातील पंधरा हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जुलै**

सामाजिक उपक्रमामध्ये प्राधान्याने पुढाकार घेऊन समाजसेवेचा तप पूर्ण करणारे शिवसेना जिल्हप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिनभैय्या मुळूक यांनी शिवसेना वर्धापन दिनानिमित्त बीड शहरातील पंधरा हजार शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. बीड शहरातील कंकालेश्वर विद्यालय, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, केएसपी विद्यालयासह अनेक शाळांमधील तब्बल पंधरा हजार विद्यार्थ्यांना काल दि. ३० जुलै रोजी शालेय साहित्य वाटप केले. याबरोबरच शाळेतील विद्यार्थी तथा शिक्षकांच्या समस्या जाणून घेतल्या व त्या समस्या सोडवण्यासाठी शिवसेना कठीबद्ध असल्याचे आश्वासन अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी दिले.

यादरम्यान शाळा व्यवस्थापनाकडून अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक यांचा पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन शिवसेनेचे धनुष्य आम्ही उचललेले आहे. आदरणीय बाळासाहेब ठाकरे आणि दिघे साहेब यांनी ऐंशी टक्के समाजसेवा आणि वीस टक्के राजकारण करण्याचे संस्कार आम्हा शिवसैनिकांना दिलेले आहेत.



## आई वडिलांची सेवा हिच खरी ईश्वर सेवा – ह.भ.प.अक्रुर महाराज साखरे

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ जुलै**

केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अंखड हरिनाम सप्ताह व संत सावता महाराज जीवन चरित्र कथा वाचन सोहळ्याचे आयोजन दि. २०/०७/२०२३ ते दि. ०३/०८/२०२४ या काळात करण्यात आले आहे.



याविषयी सविस्तर वृत्त असे की दरवर्षी प्रमाणे याही वर्षी संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ह. पुण्यतिथीनिमित्त येथील श्री संत सावता महाराज मंदिरात वैकुंठवासी ह.भ.प. रामकृष्ण महाराज वरपगावकर व वैकुंठवासी ह. भ. श्री प. ज्ञानेश्वर माऊली महाराज उत्रेश्वर पिंप्रीकर यांच्या कृपा आशिर्वादाने व जेष्ठ नेते तथा सामाजिक कार्यकर्ते राम प्रभु राऊत (मेजर) यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व संगीत विशारद भागवत कथाकार ह.भ.प. सुमंत महाराज डाके व भ. प. वैभव महाराज फुलझळके व ह.भ.प. बाळु महाराज कोरडे, यांच्या सुमधुर गायनाने आणि ह.भ.प. विलास महाराज कोरडे यांच्या पखवाज वादनाने व संत सावता यंग ग्रुप व गावातील तरुण मंडळींच्या सहकार्याने भव्य दिव्य अंखड हरिनाम सप्ताह व संत सावता माळी जीवन चरित्र वाचन सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांना मिळत आहे.

दि. ३० जुलै वार मंगळवार रोजी महाराष्ट्रातील सुरु किर्तनकार ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे यांचे रात्री ९.३० ते १२.०० या वेळेत किर्तन संपन्न झाले. यावेळी आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ।।१।। कुळीं कन्यापुत्र होती जी सात्त्विक । तयाचा हरीख वाटे देवा ।।ध्रु.।। गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ।।३।। तुका म्हणे मज घडो त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ।।४।। या अभंगावर विवेचन करताना आई वडिलांची सेवा करा, ईश्वर सेवा, देश भक्ती करा असे मोलाचे मार्गदर्शन केले.

यापुढील कार्यक्रमांचा ही सर्व गावातील व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक जेष्ठ नेते राम प्रभु राऊत मेजर, अभिजित राऊत, बाळु राऊत, यांच्यासह श्री. संत सावता यंग ग्रुप व तरुण मंडळ, व गावकरी यांनी केले आहे.

## क्षीरसागरांच्या कर्तुत्वामुळे बीडकरांना प्यायला पाणी नाही!
### उड्डाणपूल व स्लीप रोड कामाच्या श्रेयासाठी क्षीरसागरांनी रिकामी लुडबुड करू नये - राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जुलै**

बीडकरांना गेली पंचवीस वर्षापासून पंधरा दिवसाला एकदा प्यायला पाणी मोठ्या मुश्किलीने मिळते. कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च झाला. तीस वर्ष सत्ता भोगूनही आज बीड करांचा पाण्याचा प्रश्न मिटला नाही. बीड शहराची बकाल अवस्था करण्याचे श्रेय सर्व क्षीरसागरांना जाते. निवडणुका डोळ्यासमोर पाहून, पुन्हा एकदा विकासाच्या नावाखाली क्षीरसागरांनी सुरु केलेली लुडबुड निष्फळ ठरेल. नागरिकांचे मुलभूत प्रश्न सोडवण्या ऐवजी उड्डाणपूल व स्लीप रोड कामाचे श्रेय घेण्यासाठी लुडबुड करू नये. असा सल्ला भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष क्षीरसागरांना दिला आहे.

भाजपा राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, आ. नमिताताई मुदंडा, आ. लक्ष्मण पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, रमेशराव आडसकर, अक्षय मुंदडा यांच्या शिष्ट मंडळाने भूपृष्ठ वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांची दिल्ली येथे दि. २०/१०/२०२१ रोजी भेट घेऊन बीड जिल्हातील नागरिकांच्या सोयीसाठी रस्ते आणि पुलांचे प्रश्न मार्गी लावावेत अशी मागणी केली होती. छत्रपती संभाजीनगर ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगत स्लीप रोड, बाह्य वळण रस्त्यावर उड्डाण पूल, बिंदुसरा नदीवर पूलकम बंधारा, बीड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीसाठी लागणारा निधी अशा विविध कामांना प्राधान्य देऊन, रस्ते विकासाची कामे मार्गी लावावेत अशी मागणी केली होती. ना. गडकरी यांनी त्यावेळी तात्काळ दखल घेऊन, रस्ते विकासाचे काम हाती घेतले होते. त्या निर्देशानुसार आज कार्यवाही सुरु असून, केवळ पंकजाताई मुंडे व प्रितमताई मुंडे यांच्या प्रयत्नातून विकास कामांना गती मिळाली आहे. परंतु जसजशी विधानसभा जवळ येत आहे. क्षीरसागर कुटुंबीयांची स्वार्थी धडपड सुरू झाली.

## आवसगावचे जेष्ठ व्यक्तिमत्त्व श्रीधर आप्पा शिनगारे पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ जुलै**

केज तालुक्यातील आवसगाव येथील जेष्ठ व्यक्तिमत्त्व तथा सर्वांचे आप्पा या नावाने सुपरिचित असणारे मनमिळाऊ स्वभावाचे स्वाभिमानी व्यक्तीमत्व तथा श्री. प्रदिप शिनगारे , डॉ.प्रशांत दादा शिनगारे व आवसगावचे सरपंच विश्र्वास शिनगारे यांचे वडील मा.श्रीधररावजी गणपत शिनगारे पाटील यांचे काल दि.३०/७/२०२४ रोजी मंगळवारी सायंकाळच्या सुमारास वृध्दापकाळाने दुःख निधनाची वार्ता माहिती होताचा सर्वांनी आप्पांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत एक दिलखुलास व शिनगारे परिवारातील स्वाभिमानी व्यक्तीमत्व हरपल्याची मनोगत नागरिकांनी व्यक्त केले.



**सर्वांच्या सहवासात असणारे आप्पा काळाच्या पडद्याआड**

सदैव गावातील सर्वांना आपलेसे वाटणारे व सतत भेटलेल्या प्रत्येक नागरिकांची आस्थेवाईकपणे विचारपूस करणारे आप्पा आज आपल्यात राहिले नसल्याचे दुःख सर्वांच्या तोंडी ऐकायला आले आप्पांनी आपल्या हायातीत कधीच आपल्या स्वाभिमानी स्वभावाशी कधीच तडतोड केली नाही अशा या आवसगावच्या जेष्ठ व्यक्तिमत्त्वास भावपूर्ण श्रद्धांजली.


## नगर परिषद परळी वैजनाथ
## ई-निविदा क्र.(०३), (०४), (०५) / बांधकाम विभाग/२०२४-२५

मुख्याधिकारी नगर परिषद परळी वैजनाथ यांनी ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा सुचना दिनांक ३०.०७.२०२४ रोजी खालीलप्रमाणे www.mahatenders.gov.in या सांकेतीक स्थळावर प्रसिध्द केली आहे.

| अ.क्र | ई-निविदा | निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | निविदा स्विकृतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | 03 | 30.07.2024 सकाळी 11.00 | 13.08.2024 सायं.06.00 |
| 2 | 04 | 30.07.2024 सकाळी 12.00 | 05.08.2024 सायं.06.00 |
| 3 | 05 | 30.07.2024 सकाळी 05.00 | 07.08.2024 सायं.06.00 |

तरी वरीलप्रमाणे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर निविदा नमुना पहावा. निविदा बाबत सुचना सदर सांकेतीक स्थळावर प्रसिध्द केल्या आहेत. तेंव्हा इच्छुक निविदा धारकांनी वरीलप्रमाणे निविदा भरावी.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**नगर परिषद परळी वैजनाथ**


## भाजपाने तिकीट नाकारले तरकेज विधानसभेची निवडणूक लढवणारचं : काय म्हणाल्या माजी आमदार संगिता ठोंबरे ?
### माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी अंबाजोगाईत माध्यमांशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३१ जुलै**



केज मतदारसंघातील जनतेनं माझ्यावर विश्वास टाकीत त्यांची सेवा करण्याची संधी मला दिली आहे. केज मतदारसंघाच्या विकासासाठी मी निवडणूक लढविण्याचा निर्धार केला असून यंदाच्या निवडणुकीत मी पुर्ण ताकदीने निवडणूकीला सामोरे जाणार आहे, अशी स्पष्ट भूमिका केज मतदारसंघाच्या माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी माध्यमांशी बोलताना विषद केली.

केज विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाईत आज माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या पत्रकार परिषदेला भाजपाचे दिलीप काळे, विजयप्रकाश ठोंबरे, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाहुळे, 'भिमशक्ती' चे भिमराव सरवदे यांच्यासह आदींची यावेळी उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेत बोलताना माजी आमदार संगिता ठोंबरे म्हणाल्या की, केज विधानसभा मतदारसंघाची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. या निवडणुकीत एक व्हिजन डोळ्यासमोर ठेवून निवडणूक लढविण्याचा निर्धार केला आहे. केज विधानसभा मतदारसंघात अजूनही विकासाची बरीच कामं प्रलंबित आहेत. त्यासोबतचं केज मतदारसंघातील जिव्हाळ्याचे प्रश्न अजूनही मार्गी लागले नाहीत. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विधानसभेची निवडणूक लढवणार आहे. निवडणूक लढताना मतदारसंघातील जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणार असल्याचे माजी आमदार ठोंबरे यांनी सांगितले.केज मतदारसंघातील धनेगाव येथील प्रकल्पात मराठवाड्याचं हक्काचं ३ टीएमसी पाणी आणण्यासाठी मी प्रयत्न करणार असून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'एमआयडीसी' ची निर्मिती अंबाजोगाई आणि केज या ठिकाणी करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासोबतच अंबाजोगाई जिल्ह्याचा प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून रखडला आहे. त्याही प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी मी कटीबद्ध असल्याचे ठोंबरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

विविध प्रश्नांवर भूमिका केली स्पष्ट

केज विधानसभा निवडणुकीत भाजपाने तिकीट नाकारले तर आपण कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार ? असं पत्रकारांनी विचारले असता त्यांनी आज तरी पर्याय नसल्याचे सांगत येणाऱ्या काळात जो चांगला पर्याय असेल त्या पक्षाकडून निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले. दरम्यान, संगिता ठोंबरे यांनी मतदारसंघातील विविध प्रश्नांवर मनमोकळ्यापणाने चर्चा करून विविध प्रश्नांवर आपली भूमिका स्पष्ट केली. या पत्रकार परिषदेला मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.

# महसूल विभागाकडून महसूल पंधरवड्याचे आयोजन

## लोकाभिमुख योजना लोकापर्यंत पोहचविण्यसाठी विविध उपक्रमाचे आयोजन

अहमदनगर : महसूल विभागाकडून दरवर्षी महसूल दिन आणि महसूल सप्ताहाचे आयोजन केले जाते. यात या वर्षी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बदल करून महसूल पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पर्यंत महसूल पंधरवडा साजरा केला जाणार आहे.

या १५ दिवसात महसूल विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबवून महसूल विभागाचा कारभाराची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचवली जाईल आणि लोकांमध्ये महसूल विभागाबद्दल अधिक विश्वास निर्माण होऊन कारभार अधिक लोकाभिमुख होईल असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांची नागरिकांना अधिक माहिती मिळावी आणि त्यांची कामे जलद आणि सोपी व्हावी यासाठी महसूल सप्ताह १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट राबविला जाणार आहे.

या पंधरवड्यात विविध उपक्रम राबविले जाणार असून नागरिकांना त्याचा मोठा फायदा होणार आहे. १ ऑगस्टरोजी महसूल दिन साजरा करून महसूल सप्ताहाचा शुभारंभ केला जाईल. या दिवशी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्जदारांना लागणारी सर्व कागदपत्रे दिली जातील.

२ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, ३ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना , ४ ऑगस्ट रोजी स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, ५ ऑगस्ट रोजी कृषी मार्गदर्शन कार्यक्रम, ६ ऑगस्ट रोजी शेती, पाऊस आणि दाखले उपक्रम राबविला जाणार आहे.




# सुभाष बागल लिखित 'कुणबी माझा' या कवितासंग्रहाचे प्रकाशन

छत्रपती संभाजीनगर : साहित्यिक सुभाष बागल लिखित 'कुणबी माझा' या कवितासंग्रहाचे शिवछत्रपती महाविद्यालयातील मराठी विभाग आणि कैलास पब्लिकेशन्स, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशन ३ ऑगस्ट २०२४ रोजी, सायंकाळी ५ : ३० वाजता शिवछत्रपती कॉलेजच्या सभागृहामध्ये संपन्न होणार आहे. मराठी साहित्यातील विख्यात कवी तथा साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित साहित्यिक श्रीकांत देशमुख, नांदेड यांच्या शुभहस्ते या कवितासंग्रहाचे प्रकाशन होणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक, विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे हे असणार आहेत. या कवितासंग्रहावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, समीक्षक डॉ. सर्जेराव जीगे हे भाष्य करणार आहेत.




# मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या सिल्लोड येथून होणार लाडकी बहीण योजनेची सुरुवात : पालकमंत्री अब्दुल सत्तार

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.३०, महिला सशक्तीकरण अभियान अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची राज्याची सुरुवात मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. २ ऑगस्ट शुक्रवार रोजी सिल्लोड येथून होणार असून या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी केले.

दि. २ ऑगस्ट रोजी सिल्लोड येथे होणाऱ्या लाडकी बहीण योजना कार्यक्रमानिमित्त ना. अब्दुल सत्तार यांनी सिल्लोड तालुक्याचा दौरा करून पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या आढावा बैठका घेतल्या. यावेळी ना. अब्दुल सत्तार यांनी वरील अवाहन केले.

सिल्लोड येथे होणाऱ्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने मंत्री



अब्दुल सत्तार यांनी मंगळवारी ( दि.३० ) भवन, बनकिन्होळा, अंधारी, भराडी, आमठाणा, घाटनांद्रा इत्यादी गावांत बैठका घेतल्या.

या कार्यक्रमाबाबत नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह असून कार्यक्रमास विक्रमी संख्येने महिलांची उपस्थिती असणार आहे. पावसाचे दिवस असल्याने या कार्यक्रमासाठी भव्य वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आले आले असल्याचे ना. अब्दुल सत्तार म्हणाले. महिला सशक्तीकरण अभियान अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची राज्याची सुरुवात सिल्लोड हुन होत आहे. त्याअनुषंगाने या कार्यक्रमास विक्रमी संख्येने उपस्थित राहण्याचे अवाहन ना. अब्दुल सत्तार यांनी तालुक्यातील विविध गावात झालेल्या आढावा बैठकीत केले.




# बजाज नगर मध्ये बिबट्या फिरत असल्याची दिवसभर चर्चा

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर नंतर वाळूज औद्योगिक परिसरात बिबट्या फिरत असल्याची चर्चा आठवडाभरापासून जोरात सुरू आहे त्यातच आज सकाळी वाळूज महानगर १ मध्ये बिबट्या दिसल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे वाळूज एमआयडीसी मध्ये आता बिबट्या आला असे असे मेसेज दिवसभर सोशल मीडियावर फिरत होते.

वाळूज महानगर एक परिसरात बिबट्या दिसल्याचे एका बांधकाम साइटवरील वाचमेनने रहिवाशांना सांगितले. मात्र, तो बिबट्या होता की अन्य कोणता प्राणी हे त्याला सांगता आले नाही. सकाळपर्यंत हा मॅसेज व्हायरल झाला. त्यामुळे परिसरातील काही शाळांनी खबरदारी म्हणून शाळा वेळेपूर्वीच सोडली आणि मुलांना घरी पोचवण्याची व्यवस्था केली.

वन विभागाने वन परिक्षेत्र अधिकारी दादासाहेब तौर यांना संपर्क साधला असता ते म्हणाले की ' तसा काही प्रकार नाही. परिसरात बिबट्या दिसला अशी काही माहिती नाही त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन त्यांनी केले.

# अक्षय सारडा यांची अध्यक्षपदी निवड

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद मिडटाऊन एनएक्स शाखेच्या अध्यक्षपदी अक्षय सारडा, सचिवपदी अक्षय अग्रवाल तर कोषाध्यक्षपदी प्रतिक अग्रवाल यांची निवड करण्यात आली.

मावळते अध्यक्ष प्रवी तायल यांनी सन २०२४-२५ या वर्षाची कार्यकारिणी जाहिर केली असून नवीन सभासदांचा पदग्रहण समारंभ लवकरच आयोजित करण्यात येणार आहे.

या शाखेची उर्वरित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : फर्स्ट लेडी सीए पायल सारडा, प्रथम उपाध्यक्ष सीएस विपुल शर्मा, द्वितीय उपाध्यक्ष स्वराज पाटील, तृतीय उपाध्यक्ष मधुर देसरडा, सहसचिव अजिंक्य सिकची आदींची निवड करण्यात आली.






सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ‘विष्णुपुरी’ प्रकल्पावर अपुरे मनुष्यबळ

## दरवाजा उचलण्यासाठी अप्रशिक्षित कामगारांचा वापर



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३१ जुलै -**

आमदार शामसुंदर शिंदे यांनी विष्णुपुरी प्रकल्पाच्या विद्युत पंप उद्धरण नलिकेसाठी १६० कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी मिळून घेतल्याने विष्णुपुरी प्रकल्प पुन्हा चर्चेत आला आहे. परंतु दुसरीकडे मात्र अपुऱ्या मनुष्यबळावर विष्णुपुरी प्रकल्पाचा कारभार सुरू आहे. सध्या पावसाळा सुरू असून प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे. परंतु दरवाजा उचलण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसून अप्रशिक्षित कंत्राटी कामगारांच्या माध्यमातून दरवाजा उचलण्यात येत आहे. विशेष म्हणजे विद्युतचा एकही कायम कर्मचारी या ठिकाणी नाही. त्यामुळे भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

नांदेड शहराला पाणीपुरवठा तसेच परिसरातील शेत सिंचनासाठी विष्णुपुरी परिसरात आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प आहे. परंतु या प्रकल्पावर बोटावर मोजण्याईतके कायम कर्मचारी कार्यरत आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या ठिकाणी जास्तीचे मनुष्यबळ घेणे आवश्यक आहे. पूर परिस्थितीमुळे या ठिकाणी कालवा निरीक्षक व मोजणीदार यांना नियुक्त केले असले तरी आपत्कालीन परिस्थितीत काम करण्याचे प्रशिक्षण त्यांना देण्यात आले नाही. त्यातच दरवाजा उचलण्यासाठी कंत्राटी कामगारांचा वापर करण्यात येत आहे. सध्या प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरलेला असून कुठल्याही क्षणी एक नव्हे तर जास्तीचे दरवाजे उघडण्याची गरज पडू शकते. परंतु दरवाजा उचलण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी नसल्याने अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी यांत्रिकीचे दोन, पाटबंधारेचे दोन तसेच कालवा निरीक्षक व मोजणीदार कर्तव्यावर आहे तर चार ते पाच कंत्राटी कामगार असून केवळ एक पोलीस कर्मचारी सुरक्षेसाठी तैनात आहे. विशेष म्हणजे दरवाजा उचलण्यासाठीच्या विद्युत विभागाचा एकही कायम कर्मचारी कर्तव्यावर नाही.

**अधिकारी दक्ष परंतु कर्मचारी कमी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा सामना करण्यासाठी कार्यकारी अभियंता बनसोडे विष्णुपुरी प्रकल्पाचे उपविभागीय अधिकारी अरुण अंकुलवार कनिष्ठ अभियंता बागवान हे अधिकारी लक्ष असले तरी कुशल असे कर्मचारी नसल्याने या अधिकाऱ्यांची देखील तारांबळ उडत असल्याचे दिसून येत आहे पाण्याचा प्रवाह वाढल्यास किंवा आपत्कालीन परिस्थितीत दरवाजा उचलण्याची वेळ आल्यास या अधिकाऱ्यांना रात्री मी रात्री धावपळ करावी लागत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहेत.

# विधानसभा निवडणूक मनसे स्वबळावर लढणार : शिरोळे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३१ जुलै -**

लोकसभा निवडणुकीत मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु आता आगामी विधानसभा निवडणुकीत मनसे पूर्ण ताकदीने उतरणार आहे. त्यासंबंधाने राज्यभरात आढावा घेण्यात येत असून विधानसभा निवडणूक मनसे स्वबळावर लढणार असल्याचे मनसेचे प्रदेश सरचिटणीस रणजीतसिंह शिरोळे यांनी सांगितले

नांदेड जिल्ह्याचा आढावा घेण्यासाठी प्रदेश सरचिटणीस रणजीत शिरोळे व पक्ष निरीक्षक सुदाम कोंबडे दौरावर आले असता पत्रकारांशी बोलत होते. पुढे बोलताना रणजीतसिंह शिरोळे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे पुन्हा पंतप्रधान व्हावेत यासाठी पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना २५० जागा लढणार आहे. त्यामुळे राज्यभरात संघटना,



पदाधिकाऱ्यांची भेट तसेच इच्छुक उमेदवार याबाबत आढावा घेण्यात येत असून त्याची तपशीलवार माहिती पक्षप्रमुख राज ठाकरे यांना सादर करण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदारसंघात मनसे उमेदवार उभे करणार आहे. दि १ ऑगस्टपासून पक्षप्रमुख राज ठाकरे राज्यभर दौरा करणार असल्याची माहिती रणजीतसिंह शिरोळे यांनी दिली.

यावेळी जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंग जहागीरदार, ग्रामीण जिल्हाध्यक्ष रवी राठोड, शहराध्यक्ष अब्दुल शफिक आदींची उपस्थिती होती.

# कवाना येथील उपोषणाच्या समर्थनार्थ हदगाव शहरात कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, ३१ जुलै -**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून दिल्या जात असलेले जात प्रमाणपत्र तात्काळ रद्द करण्यात यावे या मागणीसाठी हदगाव तालुक्यातील कवाना येथे आमरण उपोषणास बसलेले दत्तात्रय अनंतवार यांची मागणी शासनाने तात्काळ मान्य करावी ह्या मागणी साठी हदगाव तालुक्यांतील सकल ओ.बी.सी.समाज बांधवांनी दिं ३१ जुलै रोजी शहर कडकडीत बंद ठेऊन शहरातील मुख्य रस्त्याने रॅली काढत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील संविधानाच्या प्रतिमेसमोर नमन करून रॅलीने तहसील कार्यालय येथे प्रशासनाचा जाहीर निषेध नोंदवला.

दत्तात्रय आनंदवार हे मागील अकरा दिवसांपासून आमरण उपोषणास बसले आहेत. परंतु अजूनही शासनाने त्यांच्या उपोषणाची दखल घेतली नाही त्यांची दिवसेंदिवस प्रकृती खालावत आहे. त्यामुळे हदगाव तालुक्यातील समस्त ओबीसी बांधवानी अनंतवार यांच्या समर्थनार्थ हदगाव शहर कडकडीत बंद ठेवून राज्य सरकारचा निषेध व्यक्त केला. या बंदला शहरातील व्यापाऱ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. ओबीसी समाजाच्या प्रश्नावर राज्य शासनाने त्वरित लक्ष केंद्रित नाही केल्यास ओबीसी समाज येणाऱ्या काळात याही पेक्षा तीव्र आंदोलन करणार असल्याचे यावेळी ओबीसी समाज बांधवांनी सांगितले. यावेळी ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाच घेणाऱ्या लिपिकास ३ वर्षाची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३१ जुलै -**

फेरफारची नकल देण्यासाठी लाच घेणार्या हिमायतनगर येथील तहसील कार्यालयातील लिपिक सुनीता गोपेवाड यांना अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश भोकर यांनी वेगवेगळ्या कलमातंर्गत तीन वर्षाचा कारावास व चार हजार रुपये दंड सुनावला आहे.

हिमायतनगर तहसील कार्यालयातील लिपिक सुनिता दत्तात्रय गोपेवाड यांनी एका ६३ वर्षीय तक्रारदारास त्यांच्या आंदेगाव येथील शेत गट नं.२२५ ची फेरफार नकल देण्यासाठी लाचेची मागणी केली होती. या प्रकरणी तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली असता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून लिपिक सुनीता गोपेवाड यांना रंगेहात पकडून त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याची सुनावणी आज भोकर न्यायालयात झाली. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश भोकर यांनी सुनीता गोपेवाड यांच्याविरुध्द आरोप सिध्द झाल्याने कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मध्ये एक वर्षाचा कारावास व एक हजार रुपये दंड तसेच कलम १३ भ्रष्टाचार अधिनियम १९८८ मध्ये दोन वर्षाचा कारावास व तीन हजार रुपये दंड, दंड न भरल्यास तीन महिन्याचा वाढीव कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

## मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३१ जुलै -**

क्रीडा व युवक सेवा संचालनालया अंतर्गत आयोजित जिल्हा, विभाग व राज्यस्तर स्पर्धेत आपले नैपुण्य दाखविण्यासाठी गरीब, होतकरु विद्यार्थ्यांना संधी मिळावी म्हणून १ ते २० ऑगस्ट, २०२४ दरम्यान जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व तायक्वॉदो प्रशिक्षण केंद्र, नांदेडच्या वतीने मोफत प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभर यांनी केले आहे.

# पोलीस दलातील निवडीबद्दल क्रांती व्यवहारे यांचा वर्षाताई भोसीकर यांच्याकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, ३१ जुलै -**

नांदेड जिल्ह्यातील नुकत्याच झालेल्या पोलीस भरती मध्ये बोरी (बु.) तालुका कंधार येथील विद्यार्थिनी कुमारी क्रांती उत्तम व्यवहारे या मुलीने घवघवीत यश संपादन केले असून,सर्वमासान्य शेतकरी कुटुंबातील क्रांती ची पोलीस दलामध्ये वयाच्या आठराव्या वर्षी गुणवत्तेवर क्रांती ची पोलीस दलामध्ये निवड झाली.

या यशाबद्दल आज कंधार येथे सामाजिक कार्यकर्त्या तथा नांदेड जिल्हा महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा सौ.वर्षाताई भोसीकर यांनी कुमारी क्रांती चा सत्कार करून भावी कार्याच्या शुभेच्छा दिल्या.

क्रांती चे शिक्षण इयत्ता १२ वी झाले असून तिने मुंडे अकॅडमी कंधार येथे क्लास केले होते.याप्रसंगी सौ. वर्षाताई यांनी सर्व मुलींना आवाहन केली की कु.क्रांती चा असाच प्रकारे सर्व मुलींनी आदर्श घेऊन उच्च शिक्षण घेत यश संपादन करावे व आपल्या कुटुंबाचा गावचा मान वाढवावा अशा प्रकारच्या शुभेच्छा,सौ.वर्षाताई यांनी दिल्या यावेळी संजय शिक्षण संस्था कंधार



चे उपाध्यक्ष कृष्णाभाऊ भोसीकर,प्रभाकर व्यवहारे उपस्थित होते कुमारी क्रांतीच्या यशाबद्दल सर्व नागरिकांतून कौतुक होत आहे.

# महसूल सप्ताह विविध उपकृमांनी साजरा करणार : डॉ.धम्मप्रिया गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, ३१ जुलै -**

राज्यभर महसूल दिन साजरा करण्यात यावा या आदेशाला अनुसरून यावर्षी देखील शासन निर्णयानुसार नायगांव तालुक्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला प्राधान्य देत विविध उपक्रम राबवून दिनांक १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कार्यकाळात महसूल सप्ताह उत्साहात साजरा करणार असल्याची माहिती नायगाव च्या तहसीलदार डॉ. धमप्रिया गायकवाड यांनी आज दि. ३० जुलै २०२४ रोजी मंगळवारी तहसील कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.



तालुका परिसरातील महसुली कामे वेळेवर पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून तहसील प्रशासन सज्ज असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेसाठी लागणारी लागणारे उत्पन्न प्रमाणपत्र, नागरिकत्व प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, राशन कार्ड हे लोकांना लवकरात लवकर देण्याच्या दृष्टिकोनातून आमचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र इंटरनेट चा प्रश्न उद्भवत आहे त्यामुळे थोडासा विलंब होत आहे. आणि योजनेसाठी पुर्ण ऑगष्ट महिन्याचा कालावधी शिल्लक आहे तेव्हा लाभार्थ्यांनी काळजी करू नये सर्व बहिणींचे अर्ज ऑनलाईन होतील आज घडीला तालुक्यांमध्ये २४,३८१ अर्ज हे ऑनलाईन झाले आहेत त्यासाठी गट विकास अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी यांसह गावपातळीवर ग्रामसेवक, केंद्रचालक, अंगणवाडी सेविका यांचे युध्द पातळीवर कार्य सुरू असल्याची माहिती तहसीलदार गायकवाड यांनी दिली. त्याचबरोबर दिनांक १ ऑगस्ट रोजी महसूल दिनाचा शुभारंभ करीत असताना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना याविषयी माहिती देणे, २ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना, ३ ऑगस्ट मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, ४ ऑगस्ट रोजी स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, ५ ऑगस्ट सैनिक हो तुमच्यासाठी, ६ ऑगस्ट एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा, ७ ऑगस्ट महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी पुरस्कार वितरण व महसूल सप्ताहाची सांगता समारंभ आयोजित करणार असल्याचे सांगितले. यावेळी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार संजय देवराये, विजय यरावार, अव्वल कारकून शेख युनूस यासह महसूल कर्मचारी उपस्थित होते.

## तहसिलविरोधात ’इन्साफ’ करणार आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड, ३१ जुलै -**

सबळ पुरावे असुनही जाणिवपुर्वक मुस्लिम समाजातील अर्जदारांना आर्थिक दुर्बल घटक अर्थात ई.डब्लू.एस.चे प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करुन अन्याय करणाऱ्या मुखेड तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार नंदकिशोर भोसीकर यांच्या विरोधात शुक्रवार दि. २ ऑगस्ट रोजी दु.२ वाजता तहसिल कार्यालयात ठिय्या आंदोलन करणार असल्याचे निवेदन ऑल इंडिया तन्जीम ए इन्साफचे जिल्हाध्यक्ष रियाज शेख यांनी दिले.

यावेळी ऑल इंडिया तन्जीम ए इन्साफचे जिल्हाध्यक्ष रियाज शेख, तालुका प्रभारी बबलु मुल्ला, शेख शब्बीर हैदर, शेख उस्मान मौलाना, शेख सोहेल रसुलसाब, आयाझखान पठाण, ईरफान शेख, खाजा मैनोद्दीन शेख सह अनेक अर्जदार उपस्थित होते.

# किनवट आगाराकडून नांदेडसाठी बस फेऱ्यांमध्ये वाढ

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, ३१ जुलै -**

प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेता किनवट आगाराकडून नांदेड साठी बस फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली आहे.सकाळी नांदेड मार्गे लातूर पर्यंत व परत सायंकाळी नांदेड वरुन किनवट पर्यंत अशा प्रकारची वाढ करण्यात आली आहे.

किनवट हा आदिवासी बहुल तालुका असून जिल्ह्यापासून दिडशे कि.मी.अंतरावर आहे.येथील लोकांना नांदेड येथे कामानिमित्त जाणे-येणे करावे लागते.या प्रवासाकरीता एसटी बसच्या फक्त दोनच फेऱ्या होत्या. रेल्वे चा आसरा आहे.पण सध्या मागील काही महिन्यांपासून रेल्वे उशीरा येणे, ऐनवेळी रद्द होणे इत्यादी गोष्टींमुळे रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले असून याचा परिणाम तालुक्यातील जनतेवर पडला आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी म्हणून बस खेळांमध्ये वाढ करण्याचा निर्णय किनवट आगारांनी घेतला असून सकाळी ०५.३० वाजता लातूरकरिता नांदेड मार्गे बस सोडण्यात येत आहे.लगेच ०६.३०,व दुपारी १२.३० वाजता नांदेड करीता किनवट आगारातून एसटी सुटेल,परतीच्या प्रवासाला नांदेड येथून किनवट करीता सकाळी ०८.३० वाजता, १०.३० वाजता व सायंकाळी ०५.०० वाजता नांदेड आगारातून एसटी सुटेल. सदर एसटीचा प्रवाशांना दवाखाना,व्यापार व इतर गोष्टीसाठी सवलतीचे होईल. नांदेड करीता वाढलेल्या एसटीमुळे प्रवाशांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. याचप्रमाणे प्रवाशांची मागणी लक्षात घेऊन किनवट येथून सायंकाळी सहा दरम्यान गाडी सोडण्याचे आश्वासनही आगार प्रमुख एस. टी. शिंदे यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली आहे.




## कार्यालय हिमायतनगर नगरपंचायत, हिमायतनगर जि.नांदेड

नगरपंचायत प्रशासकीय इमारत
लकडोबा चौक, हिमायतनगर ता.हिमायतनगर जि.नांदेड-४२१८०२
ई.मेल : nphimavatnagara@gmail.com

जा.क्र. नपंहि/ विभाग / ७१९/२०२४ दिनांक : ३०/०७/२०२४

### जाहिर निविदा सुचना (वार्षिक तत्वावर)

सन २०२४-२५ सालासाठी हिमायतनगर नगरपंचायती करीता खालीलप्रमाणे विविध कामांसाठी, साहित्य खरेदीसाठी स्वतंत्र दरपत्रक दि. १/०८/२०२४ ते दि. ८/८/२०२४ या कालावधीत दुपारी ०४:०० वाजेपर्यंत नगरपंचायत कार्यालय, हिमायतनगर येथे स्विकारण्यात येतील. प्रत्येक कामाची अनामत रक्कम, नियम व अटी, कोरे निविदा दरपत्रक बाबतचा तपशिल नगरपंचायत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून पहावयास मिळतील.


| अ. क्र. | कामाचे नाव | अनामत रक्कम रु. | कोरे निविदा फॉर्मची किंमत रु. |
|---|---|---|---|
| ०१. | नगरपंचायत हद्दीतील ०१ एवपी ते ७.५ एचपी पर्यंतचे सर्व सबमर्सिबल पंप, मोटार स्टार्टर दुरुस्ती करणे, मोटार काढणे / टाकणे. | २०००/- | ५००/- |
| ०२. | नगरपंचायत हद्दीतील गाळात फसलेल्या मोटारी काढणे. | २०००/- | ५००/- |
| ०३. | पाणीपुरवठा विभागासाठी लागणारे नवीन मोटार, स्टार्टर, केबल व अनुषंगीक साहित्य पुरवठा करणे. | २०००/- | ५००/- |
| ०४. | जलशुध्दीकरण केंद्र येथे ब्लीचींग पावडर व तुरटी पुरवता करणे. | २०००/- | ५००/- |
| ०५. | विंधन विहीर रि-बोअर करणे. | २०००/- | ५००/- |
| ०६. | विद्युत विभागासाठी लागणारे सर्व साहित्य पुरवठा करणे. | २०००/- | ५००/- |
| ०७. | स्वच्छता विभागासाठी साहित्य पुरवठा करणे. | २०००/- | ५००/- |
| ०८. | शहरात आवश्यकतेनुसार नालीवरील पुलाचे बांधकाम करणे. | २०००/- | ५००/- |
| ०९. | शहरात आवश्यकतेनुसार मुरुम चुरी पुरवठा करणे. | २०००/- | ५००/- |
| १०. | विविध विभागांसाठी कुशल/ अर्धकुशल/ अकुशल मनुष्यबळ पुरवठा करणे. | २०००/- | ५००/- |
| ११. | न.प. कार्यालयासाठी स्टेशनरी छपाई, झेरॉक्स साहित्य पुरवता करणे, | २०००/- | ५००/- |
| १२. | न.पं. कर्मचारी गणवेश पुरवठा करणे. | २०००/- | ५००/- |
| १३. | बॅनर छपाई करून पुरवठा करणे. | २०००/- | ५००/- |
| १५. | न. प. कार्यालयात संगणक पुरवठा करणे, संगणक दुरुस्ती, संगणक साहित्य पुरवठा व अनुषंगीक कामे करणे. | २०००/- | ५००/- |
| १६. | शहरातील हायमास्ट दुरुस्ती व नवीन हायमास्ट बसविणे, | २०००/- | ५००/- |
| १७. | राष्ट्रीय सण / कार्यक्रम उत्सव करीता लागणारे सर्व प्रकारचे साहित्य पुरवठा करणे. | २०००/- | ५००/- |
| १८. | कार्यालयीन कामासाठी वाहन पुरवठा करणे. | २०००/- | ५००/- |
| १९. | घनकचरा व्यवस्थापन कागात उपयोगात येणाऱ्या वाहनाची दुरुस्ती करणे. | २०००/- | ५००/- |

**अटी व शर्ती**

१. दरपत्रकासोबत आपल्या व्यवसायाशी संबंधीत शासन नियमानुसार आवश्यक ते सर्व परवाने उदा. दुकानाचे लायसन्स/ विक्रीकर/ आयकर विभाग व सेवा कर (GST) विभाग, कामगार पुरवठा संबंधी भविष्य निर्वाह निधी विभागाची नोंदणी प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडणे बंधनकारक आहे.
२. मनुष्यबळ पुरवठा कामासाठी दरपत्रक सादर करतांना किमान वेतन कायदाप्रमाणे सादर करावे.
३. नियमानुसार करारनामा केल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येईल.
४. दरपत्रकात दर भरत असतांना शासन नियमानुसार त्यात सर्व कर अंतर्भुत करावे.
५. लिफापबंद निविदा (दरपत्रक) मुख्याधिकारी यांचे कार्यालयात दि. ८ /८ /२०२४ रोजी दुपारी ०४:०० वाजेपर्यंत स्वीकारले. जातील.
१०. कोरे निविदा (दरपत्रक) रोख किमतीने नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. १/८ /२०२४ ते दि. ८/८/२०२४ पर्यंत मिळतील (सुट्टीचे दिवस वगळून).
७. अटी किंवा शर्ती असलेले निविदा (दरपत्रक) स्विकारले जाणार नाहीत.
८. निविदा दरपत्रकासोबत अनामत रक्कम रोख स्वरूपात भरणा करुन पावती दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे कोरी निविदा शुल्क भरल्याची पावती सोबत जोडावी.
९. कोणतेही किंवा सर्व निविदा (दरपत्रक) कारण न दर्शविता अमान्य किया रद्द करण्याचे अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवले आहे

स्वाक्षरीत
मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर


MOTHER GANGA ENGLISH SCHOOL
— Hivarkheda, (Gautala) Road, Tq. Kannad —
ADMISSIONS OPEN FOR
C.B.S.E. (Pattern)
• Jr.KG • Sr.KG • 1st Std.
STATE (BOARD)
1st to 10th Std.
An Art Infused School Committed to Educating and Children Leading Them Towards Global Citizenship.
वैशिष्ट्ये
> इंग्रजी माध्यम
> संगीत, डान्स, व्यक्तिमत्व विकास
> संपूर्ण शाळा व कॅम्पस CCTV
आपल्या पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आजच प्रवेश निश्चित करा
पत्ता हिवरखेडा (गौ.) रोड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर 9403407580 | 8623860549 | 9028189620 | 9422208284


दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर
आवृत्तीचा आज
वर्धापन दिन
त्यानिमित्त 'तरुण भारत' परिवारातील
सर्व सदस्यांना व वाचकांना
मन:पूर्वक
शुभेच्छा
डॉ. संजय गव्हाणे
प्रदेश कार्यकारणी सदस्य, भाजपा, महाराष्ट्र
निवडणूक प्रमुख, १०५-कन्नड सोयगाव विधानसभा


सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
३० व्या
वर्धापन
दिनानिमित्त
'तरुण भारत' परिवारातील
सदस्यांना व महाराष्ट्रातील
वाचकांना मन:पूर्वक
शुभेच्छा..!
शिवसेना
शुभेच्छुक-
श्री. रविंद्र विश्वनाथ राठोड
सरपंच तथा समाजसेवक, रीठ्ठी मोहर्डा ग्रामपंचायत, ता. कन्नड


"अशी घेऊ झेप अवकाशी
बघणाऱ्यांच्या माना उंचावतील
दृढ निश्चयाच्या मार्गावर
यशोमय दिवे लागतील.."
सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
३० व्या
वर्धापन
दिनानिमित्त
'तरुण भारत' परिवारातील
सदस्यांना व महाराष्ट्रातील
वाचकांना मन:पूर्वक
शुभेच्छा..!
शिवसेना
शुभेच्छुक-
केतन भैय्या काजे
शिवसेना तालुका प्रमुख
(१०५ कन्नड-सोयगाव विधानसभा मतदार संघ)